महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !


# पक्षिमित्र


- वर्ष – पंधरावे
- अंक १ ला
- १ ऑक्टोबर २०२४

रजि. नं. महा./285/98/ नागपूर


संपादक : किरण मोरे





Painted Stork



Knob-billed Duck
(Comb Duck)



Lesser Whistling - Duck

छायाचित्रकार

**डॉ. रणजीत चित्रकार**

परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती

**संपादक**

**श्री. किरण मोरे**

विद्यापीठ कॉलनी,एम.आय.डी.सी.रोड, मनोर मांगल्य जवळ,
अमरावती ४४४ ६०६
मो.९९२३९१००३४ Email - kiranmorey1983@gmail.com

**मार्गदर्शक**

**डॉ. निनाद शहा** सोलापूर

**श्री. अविनाश कुबल** ठाणे

## कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | **डॉ. जयंत वडतकर**, अमरावती<br>**मो. ९८२२८७५७७३** |
| कार्याध्यक्ष | – | **डॉ. राजू कसंबे**, ठाणे<br>**मो. ९००४९२४७३१** |
| संघटक | – | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे**, अहमदनगर<br>**मो. ९८५०२९१३२४** |
| कार्यवाह | – | **प्रा. डॉ. गजानन वाघ**, अमरावती<br>**मो. ९८२२२०४०७०** |
| सहकार्यवाह | – | **श्री. शरद आपटे**, सांगली<br>**मो. ९८९०३८४४००** |
| सहसंघटक | – | **डॉ. अनिल माळी**, नाशिक<br>**मो. ९८५०८१८६४४** |
| सदस्य | – | **प्रा. डॉ. निनाद शाह**, सोलापूर<br>**मो. ९४२२४५९९१५** |
| सदस्य | – | **श्री. किशोर गठडी**, औरंगाबाद<br>**मो. ९४२२२०२६२८** |
| सदस्य | – | **श्री. दिलीप विरखडे**,वर्धा<br>**मो. ७७७५८८३८६१** |
| सदस्य | – | **श्री. अविनाश कुबल**,ठाणे<br>**मो. ९३२४२३८०३१** |
| सदस्य | – | **कु. रूपाली मढवी**,मुंबई<br>**मो. ९८६९५५९९२२** |

## सल्लागार मंडळ

| | | |
|---|---|---|
| **श्री. भाऊ काटदरे** | **(चिपळूण)** | **मो. ९४२३८३१७००** |
| **श्री. दिगंबर गाडगीळ** | **(पूणे)** | **मो. ९८८१०७९७११** |
| **डॉ. दिलीप यार्दी** | **(औरंगाबाद)** | **मो. ९४२२७०४२२१** |
| **डॉ. अनिल पिंपळापुरे** | **(नागपुर)** | **मो. ९८८१७१३४६६** |
| **श्री. बापुसाहेब भोसले** | **(अहमदनगर)** | **मो.९८२२६३३१३३** |


**मुखपृष्ठ –**
**छायाचित्रकार – प्रा. नितीन सा. किटुकले,**
प्राचार्य, जे. के. अकॅडमी ऑफ आर्ट अँड डिझाईन, वडाळा, मुंबई.
**छायाचित्राचे ठिकाण –** टि. एस. चाणक्य तलाव, सिवुडस, नवीमुंबई
**छायाचित्रातील पक्षी –** 'जांभळी पानकोंबडी' Grey-headed Swamphen (Purple Swamphen) *Porphyrio poiocephalus*



## संपादकीय...

## गोष्ट सूर्य प्रकाशाइतकी स्पष्ट

सूर्य मालेतल्या नवग्रहापैकी पृथ्वी ही सूर्याची विशेष प्रिय. एक दुरचा नेपच्यून सोडला तर आठही ग्रहांना सूर्य मोफतचा प्रकाश देतो. पृथ्वीवरील सजीवांची जैवविविधता पाहता त्याच्या प्रकाशाचे महत्व इतरांच्या तुलनेत इथे जास्तच. सुमारे चौदा कोटी किलोमीटरचा प्रवास अवघ्या आठ मिनिटांत पूर्ण करून तो पृथ्वीतलावर हजर होतो. सर्व सजीव त्याची आतुरतेने वाट पाहत असतात. खासकरून वनस्पती. त्यांचे खाद्य तर प्रकाशापासूनच बनते ना ! वातावरणातील कार्बन शोषून घेण्यास सूर्यप्रकाश त्यांना मदत करतो. सदाहरित वने, शुष्क वने, वाळवंटी भाग या भागात तसेच पृष्ठभागावरील पाण्याचा खारे गोडे असा भेदाभेद न करता समुद्र, नद्या, तलाव छोटे तळे इथल्या जीवसृष्टीतही तो पोहचतो. प्रकाश संश्लेषण प्रक्रियामध्ये पाण्यातील शैवाल आणि जलवनस्पती प्रकाश शोषून घेतात. शर्करा तयार करून त्याचे खाद्यात रुपांतर करण्याची सर्व वनस्पतीची खटपट चालू असते. आणि त्यांनी सोडलेल्या प्राणवायूने इतर सर्व जलचर सृष्टीचे फावते, पाण्यातील माश्यांना सूर्यप्रकाशात स्वतःचे खाद्य नीट दिसते. पाण्यात वाढलेल्या या जलीय वनस्पतीमध्ये लपायची जागा तयार होते. घर म्हणून आपली अंडी त्यात ते देतात. याच जलवनस्पती व माश्यांच्या मागावर पाणपक्षी येतात. पाण्यात पोहता पोहता अथवा डुबकी मारून पाणवनस्पतीचे तंतु, कोंब, पाने, देठ चोचीने खुडून खाल्ले जातात. इथे तऱ्हेतऱ्हेचे कीटक, मृदु शरीर प्राणी, लहान बेडूक, मासे, त्यांची अंडी पाणपक्ष्यांकडून मोठ्या प्रमाणात फस्त केल्या जातात. माणसांपासून चार हात लांबच राहणारा देखणा रोहित सूक्ष्म जीव जीवाणू, एकपेशीय शैवाल, गोगलगायी इ. खाद्यावर विशेष अवलंबून असतो. एरवी पांढुरके असणारे रोहित उन्हाळ्याच्या सुरवातीला गर्द गुलाबी होऊन जातात. प्रजननाच्या काळात त्यांचा मुख्य आहार गुलाबी झिंगे असतात. आता या गुलाबी झीग्यांचा आहारही शाकाहारच. ते पण एक प्रकारचे शेवाळ (Oedogonium Algae) खाऊन मोठे होतात. शेवाळामध्ये कॅरोटीनाईड ठासून भरलेला. गुलाबी झिंगे मोठ्या प्रमाणात खाऊन धष्टपुष्ट बनलेले रोहित आपल्या पंखावरील लाली मादी पुढे मिरवतात. जो जास्त गुलाबी तो मादीच्या दृष्टीने प्रजननास अधिक बळकट समजला जातो. पूर्व सायबेरीयातून येणारे भिवई बदक, युरोपीय देशातून येणारे वैष्णव प्रामुख्याने शाकाहारी असणारे लालसरी बदक, पट्टेदार राजहंस, नेहमी जोडीने राहणारे चक्रवाक नोव्हेंबर ते फेब्रुवारी महिन्यात या स्थलांतरीत पक्ष्यांचे इथे मोठे

एका बाजूने डुबकी मारून थेट दुसऱ्या काठावर बाहेर निघणारी स्थानिक पानडुबी असो की पाण्यात खोलवर सूर मारून मासे पकडणारा पाणकावळा असो. सर्वांची झुंबड खाद्यासाठी. काठाकाठावरचे व उथळ भागात वावरणारे पाणपक्षीही काही काळ खोलगट पाण्याकडे येतात. जरी नदीचे पाणी अनैसर्गिपणे अडवून धरण बांधले असले तरी अशा प्रकारच्या पाण्यात एक मोठे जलचर विश्व पर्यायाने गोठी अन्नसाखळी तयार झालेली असते. तिथे जलीय वनस्पती, कृमी कीटक, कवचधारी, मासे आणि पक्षी यांच साटंलोटं छान चालू असत.

जीवनाच्या याच प्रकारच्या एकमेकावलंबी श्रृंखलेच्या अगदी स्थानिक पातळीवर विचार करता. निसर्गाच्या या अन्नसाखळीमध्ये संभाजीनगरातील जायकवाडी धरणच कसे अपवाद ठरेल तिथेही गोड्या पाण्यातील जीवसृष्टी श्रीमंत म्हणावी अशी आहे. मात्र वेगवान विकासाच्या तावडीत ही सापडलीच. गोदावरी नदीवर सुमारे ३६ हजार हेक्टरवर पसरलेले हे विस्तीर्ण धरण. इथल्या पाण्यावर पंधरा हजार एकरावर तरंगता सौर पॅनल बसवण्यासाठी सर्वे मागील वर्षी करण्यात आला. धरणाचे पाणी सौर पॅनलने झाकले राहील त्यामुळे बाष्पीभवन कमी होईल. पर्यायाने पाण्याचा साठा मोठ्या प्रमाणात टिकून राहिलं. तेच पाणी शेतीसाठी वापरता येईल. मोठ्या प्रमाणात इथे वीजनिर्मिती होणार. कुठल्याही नैसर्गिक घटकाची, जीवाश्म इंधनाची हानी न होता तयार केलेली शुद्ध वीजनिर्मिती. कार्बन उत्सर्जन याने कमी होईल. यातून रोजगार उपलब्ध होईल तो फायदा निराळाच. यातील तज्ञ लोकांनी छातीठोकपणे दिलेली ग्वाही. ती पूर्णपणे खरी असेलही! पण फायद्याच्या तुलनेत तोटा किती? याचा विचार नाही. सद्यस्थितीत जिथे जागा मिळेल तिथे सौर पॅनल लावणे चालू आहे. सपाट डोंगर, वाहतीत नसलेली शेती, माळरान इथे सजीवसृष्टी नसतेच बहुधा! पुढच्या काळात गीरचे माळरानही सौर पॅनलने झाकून गेले तर आश्चर्य वाटून घ्यायला नको ! मोठ्या प्रमाणात तयार केलेली हरित उर्जा. ज्याने होणारी अफाट प्रगती. ती पण एकाच प्रजातीची बरे का! जायकवाडी धरणाच्या तरंगत्या सौर प्रकल्पाला सगळ्यात पहिले विरोध होतो तो मासेमारांचा. सुमारे वीस हजार मासेमार कुटुंब या प्रकल्पामुळे प्रभावीत होतील. त्यामुळे हजारो मासेमार बांधव आपल्या कुटुंबासोबत धरणाच्या पाण्यात उभे राहून याला कडाडून विरोध करतात. त्यांच्या मते इथे हा प्रकल्प झाला तर मासेमारी करता येणार नाही. बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळून तोंडाचा घास हिसकावला जाईल. इथल्या जलाशयात चीलापी (Tilapia) प्रजातीचा मासा मोठ्या प्रमाणात आहे. त्याची मादी वर्षाला चार वेळा अंडी देते. त्यांची मासेमारी थांबली तर एकाच प्रजातीचा मासा मोठ्या प्रमाणात तयार होईल. आणि पूर्ण मासोळी प्रजातीच संकटात येईल, उपजीविकेच्या कारणासोबत ते आपल्या अनुभवानुसार इथल्या जलसृष्टीबाबत गर्भित इशाराही देतात. जायकवाडीच्या जलाशयात उन्हाळ्यात केवळ तीस टक्के पाणीसाठा राहतो. तेव्हा उभारलेल्या पंधरा हजार एकरावरील सौर प्रकल्पाने पूर्ण पाणीच झाकले जाईल. पाण्यात मोठ्या प्रमाणात रेडीएशन तयार होऊ शकते. त्यामुळे कॅन्सरचा धोका निर्माण होतो. पूर्णवेळ पाणी झाकल्याने जलीय तापमानात मोठे फेरबदल घडतील. एकाच प्रकारचे शेवाळ वा वनस्पती इथे वाढण्याची शक्यता आहे. त्याने इतर वनस्पती प्रजाती धोक्यात येईल. तसेच त्यावर अवलंबून असलेल्यांची उपासमारी घडेल. स्थानिक पक्ष्यांचा नैसर्गिक अधिवास कायमचा हिरावला जाईल. त्यांना मुक्तपणे विहार करता येणार नाही. अन्न, निवाराच्या शोधात परदेशातून आलेले  स्थलांतरीत पक्षी यावेळी कुठे जाणार? जायकवाडी धरणातील बराचसा भाग पक्षी अभयारण्य म्हणून राखीव आहे. युरोप, सायबेरिया, कझाकिस्तान येथून मोठ्या प्रमाणात बदकर्गीय पाणपक्षांचे स्थलांतर होते. मानद वन्यजीव रक्षक श्री. किशोर पाठक यांचे जायकवाडीतील पक्षी प्रजातीवर जागरूकता आणि संवर्धनात्मक मोठे कार्य आहे. महाराष्ट्र पक्षीमित्रचे ते आजीवन सभासदही आहे. त्यांनी या प्रकल्पावर कडाडून टीका केली. तसेच सद्यस्थितीत त्यांचा येथील पक्षी अभयारण्य वाचविण्यासाठी न्यायालयीन लढा चालू आहे.

या दशकात जगात जपान, स्वित्सर्लंड यासारख्या विकसित देशात मोठ्या प्रमाणात तरंगते सौर पॅनल लावले गेले. त्याचे फायदे आणि दुष्परिणामही हळूहळू समोर येत आहे. एक मात्र खरं बऱ्याच वर्षाच्या कालावधीत तयार झालेल्या जलीय जैवविविधतेवर जेव्हा असा प्रकल्प येतो. तेव्हा त्याचा गांभिर्याने विचार व्हायला हवा. तिथे प्रत्यक्षातील संशोधन होऊन ते संशोधन राजकीय स्तरावर मान्य व्हायला हवे. सद्यातरी मासेमार बांधव आणि पक्षीअभ्यासक मासे, पक्षी प्रजाती संकटात असल्याचे सांगतायत! भविष्यात वनस्पतीशास्त्र, मानवकल्याण यातील तज्ञ लोकांनी पुढाकार घेतला तर बऱ्याच बाबी उजेडात येतील. नुकताच वर्धा जिल्ह्यात आर्वी जवळ असलेल्या वरुड-धनोडी भागात वर्धा नदीवर सर्वे करण्यात आला. तिथेही सुमारे सातशे हेक्टर मध्ये फ्लोटिंग सौर उर्जा प्रकल्प उभारण्याची घोषणा झाली. यामध्ये वर्षाला एक हजार मिलियन युनिट उर्जा उत्पन्न होणार आणि चौदाशे रोजगार निर्मिती. इती सरकार. मग या गोष्टीचा पर्यावरणाच्या दृष्टीने अभ्यास व्हायला हवा ना!

गोष्ट तशी सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. आता गरज आहे ती पक्षीमित्र वा पर्यावरणमित्रांद्वारे त्याची शहानिशा करण्याची, वेगवान विकासाचे गुळगुळीत आवरण काढून आतल्या सत्य परिस्थितीवर लखखपणे प्रकाश टाकण्याची.

**श्री. किरण मोरे**
अमरावती

*****



# ✻ अध्यक्षीय ✻



**डॉ. जयंत वडतकर**

अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र

jayantwadatkar.wecs@gmail.com

यावेळी ऑक्टोबरचा अंक आपल्या हाती पोहोचण्यास विलंब होत आहे, त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. अलीकडच्या काळात नियमित अंक काढणे, तो प्रिंट करून सर्वांपर्यंत पोहोचविणे तसे जिकरीचे काम. परंतु महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे आपला पक्षिमित्र अंक गेल्या १५ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होत आहे या ऑनलाईनच्या जमान्यात आज सुद्धा छापील अंक पोस्टाने पाठविण्याची कसरत केली जाते. खरे तर आपल्या सभासद शुल्कचा विचार करता हे अशक्य काम आहे. सर्वच खर्च वाढले आहेत, व्याज दर कमी झालेले आहेत. पोस्ट खात्याच्या वितरण व्यवस्थेचा बोजवारा वाजलेला असतांना अंक सर्वांपर्यंत पोहोचविणे आर्थिक दृष्ट्या व संस्थेकडे कुठलाही नियमित कर्मचारी वर्ग नसतांना ही कसरत करणे अशक्यप्राय झालेले आहे. असो. तरीही आपला अंक काढण्याचा प्रयत्न केला जाईल यासाठी आम्ही प्रयत्न करीत राहू यात शंका नाही.

महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेची रीतसर नोंदणी झाल्यानंतर सुरुवातीला पक्षिमित्र हे त्रैमासिक काढण्यात आले, तर काही वर्षे चालले, मात्र मनुष्यबळाच्या अभावी ते पुढे प्रकाशित होऊ शकले नाही. त्यानंतर श्री. भाऊ काटदरे यांनी अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र पक्षिमित्रची धुरा सांभाळल्यानंतर २०११ च्या जानेवारीपासून पक्षिमित्र पुन्हा प्रकाशित होऊ लागले. या अंकाचे संपादक म्हणून आदरणीय श्री. दिगंबर गाडगीळ यांनी या कामाची जबाबदारी अंगावर घेतली. त्यांनी तेव्हापासून ते आजपर्यंत म्हणजे २०२४ सालापर्यंत संपादक म्हणून त्यांनी ही जबाबदारी सांभाळली. त्यांनी आपल्या या अंकासाठी गेल्या १५ वर्षात आपला मोलाचा वेळ देऊन त्यासाठी मेहनत घेतली. त्यामुळेच त्रैमासिक असलेला आपला अंक नियमितपणे प्रकाशित होत आहे. आज गाडगीळ सरांनी वयाची नव्वदी पार केली. त्यामुळे आता यापुढे त्यांना आणखी त्रास देवू नये या उद्देशाने, कार्यकारिणीने त्यांना संपादक या पदावरून सन्मानाने निवृत्त करण्याचा निर्णय घेतला. गाडगीळ सर संपादक म्हणून काम करीत असतांना अंकाचे साहित्य गोळा झाल्यापासून ते त्यावर संपादकीय सोपस्कार पूर्ण करून ते साहित्य छपाई साठी पाठविण्या पर्यंतचे त्याचे वेळापत्रक ठरलेले होते. प्रत्येक अंकात मला अध्यक्षीय लिहावे लागते, त्यासाठी त्यांचा ठरलेल्या दिवशी फोन किंवा इमेल यायचा. त्यानंतर मी लिहायला सुरुवात करीत असे, आणि जोपर्यंत मी ते पाठवत नाही तोपर्यंत त्यांचा पाठपुरावा सातत्याने सुरु असे. साहित्य पाठविल्यानंतर ते सेटिंग करण्याचे काम अमरावती येथे होते असे. त्यासाठी सहाय्यक संपादक किरण मोरे यांचे देखरेखीत पुढील काम होत असे. त्यावेळी सुद्धा ते किरण मोरे यांचे सतत संपर्कात राहून बारीकसारीक सूचना करीत असत. गेली सहा वर्ष त्यांच्या सोबत काम करता करता किरण मोरे हे सुद्धा संपादकाचे काम शिकत होते. त्यामुळेच श्री गाडगीळ सरांच्या ठिकाणी यापुढे संपादक म्हणून काम करण्यासाठी आम्ही सर्वांनी किरण मोरे यांचे नावावर शिक्कामोर्तब केले. त्यांनी यासाठी वेळ देण्याची तयारी सुद्धा दाखविली. यापुढे आपल्या पक्षिमित्र चे संपादक म्हणून श्री. किरण मोरे हे काम पाहतील. त्यांना सहकार्य करण्याची जबाबदारी, महाराष्ट्र पक्षिमित्रचे जेष्ठ सभासद प्रा. डॉ. निनाद शहा आणि कार्यकारणी सदस्य श्री अविनाश कुबल यांनी स्वतःहून घेतली. आजकाल एखाद्या संस्थेसाठी व संघटनेसाठी विनामोबदला काम करण्यासाठी किंवा वेळ देण्यासाठी सहजासहजी कुणी मिळत नाही. त्यात हे काम तर नियमित आहे. एक अंक प्रकाशित झाल्यानंतर पुढील अंकाच्या साहित्यासाठी लेखकांसोबत, पक्षी अभ्यासकांसोबत, छायाचित्रकारांसोबत संपर्क करणे, त्यांना लिहिते करणे, साहित्य पाठविण्यासाठी सतत संपर्कात राहणे यासाठी वेळ द्यावा लागतो. त्यानंतर पुढील संपादकीय सोपस्कार व अंक डिझाईन होईपर्यंत बराच वेळ द्यावा लागतो. अशावेळी आदरणीय दिगंबर गाडगीळ सरांनी इतके वर्षे हे काम कुठल्याही तक्रारीविना सांभाळले. याचे एकमेव कारण म्हणजे त्यांचे पक्षी प्रेम. एखादी संघटना ही माझी संघटना आहे असे ज्यांना वाटते त्यांच्यासाठी त्या संस्थेसाठी केलेले काम हे काम नसते. असो, गाडगीळ सरांनी हे काम सातत्याने इतके वर्षे सांभाळले, पक्षिमित्र चळवळ जोपासली त्यासाठी त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

भविष्यात ते महाराष्ट्र पक्षिमित्रचे सल्लागार म्हणून आम्हाला मार्गदर्शन करीतच राहतील यात कुठलीही शंका नाही.

हा अंक आपल्या हाती येईपर्यंत दिवाळी आलेली असेल, तेव्हा आपल्या सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा. यावेळी आपला पक्षी सप्ताह नेमका दिवाळीच्या नंतर येत आहे. भारतीय पक्षीविश्व व पक्षीअभ्यास शास्त्रास जागतिक स्तरावर पोहोचवणारे पै. डॉ. सालिम अली व महाराष्ट्रातील तमाम पक्षीनिरीक्षकांसाठी कायम आदरस्थानी असलेले ऋषितुल्य व्यक्तिमत्व आदरणीय श्री. मारुती चितमपल्ली या दोहोंच्या जन्मदिवसा निमित्त्याने महाराष्ट्र पक्षिमित्र कडून २०१७ पासून सुरु केलेल्या पक्षी सप्ताहात महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे या विशेष कार्यक्रम आयोजित केले जात असतात. फक्त महाराष्ट्रातच साजरा होणारा अशा प्रकारचा सप्ताह साजरा करण्यासाठी आपण सर्वजण सुद्धा या सप्ताहात आपापल्या जिल्ह्यात कार्यक्रमांचे आयोजन करावे. सदर आयोजनामध्ये स्थानिक वन विभाग, शैक्षणिक संस्था यांना सुद्धा सहभागी करून घ्यावे. मागीलवर्षी प्रमाणे या वर्षीसुद्धा इबर्ड इंडिया, बीएनएचएस आणि महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे संयुक्तपणे काही कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. या अंतर्गत ऑनलाईन वेबिनार आयोजित केले जातील तसेच या सप्ताहा दरम्यान पक्षी निरीक्षण कार्यक्रमांचे सुद्धा आयोजन करायचे आहे. या काळात विविध ठिकाणी केल्या जाणाऱ्या पक्षी निरीक्षणांच्या नोंदी आपण इ-बर्ड वर आठवणीने टाका. त्याची नोंद पक्षी सप्ताहाच्या व महाराष्ट्र पक्षिमित्रच्या नावाने होणार आहे. चला तर मग या सप्ताहाचे नियोजन करण्यास सुरुवात करूया.

महाराष्ट्र पक्षिमित्रचे पुढील ३७ वे संमेलन अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील शेवगाव येथे जानेवारीच्या शेवटी होत आहे. त्याचवेळी शेवगाव येथून जवळच असलेले जायकवाडी येथे स्थलांतरित पक्ष्यांचे संमेलन सुद्धा भरणार आहे. तेव्हा आपण संमेलनात भेटणार आहोतच. आणि जायकवाडीला भेट सुद्धा देणार आहोत.

मिळून सारे जन । करू व्दिजगण रक्षण ।।

*****

## प्रपत्र : IV


| | | | |
|---|---|---|---|
| १) | **प्रकाशन स्थळ** | : | महाराष्ट्र पक्षीमित्र, ६३, अरण्यार्पण, समता कॉलनी, कठोरा रोड, अमरावती. महाराष्ट्र. पीन कोड नं. : पीन : ४४४६०४. |
| २) | **प्रकाशन कालावधी** | : | त्रैमासिक |
| ३) | **मुद्रक** | : | श्री. जगदिश डी. सुकलकर (ज्ञानपथ प्रिंटर्स आणी ग्राफिक्स) पत्ता : वि.एम.वी.रोड, अमरावती. |
| ४) | **प्रकाशक** | : | डॉ. जयंत वडतकर (अध्यक्ष), महाराष्ट्र पक्षीमित्र |
| | **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| | **पत्ता** | : | ४२, ग्रीन पार्क कॉलनी, आशियानाजवळ, शेगाव रोड, अमरावती. पीन : ४४४६०४. |
| ५) | **संपादक** | : | श्री. किरण मोरे |
| | **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| | **पत्ता** | : | ३० (अ) विद्यापीठ कॉलनी, एम.आय.डी.सी. रोड, मनोरमांगल्य जवळ, अमरावती ४४४६०६ |

मी, जयंत सुधाकरराव वडतकर जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीनुसार बरोबर व खरी आहे.

दिनांक : १ ऑक्टोबर २०२४

सही/-

**जयंत सुधाकरराव वडतकर**

## विशेष लेख

# पाणवठे व पक्ष्यांचे वास्तव्य



**डॉ. शुभदा राठी लोहिया**
अंबाजोगाई
shubhadalohiya@gmail.com

मला आठवते की साधारण २००५ मध्ये मुलांसाठी पहिले पक्षी निरीक्षण शिबीर घेतले होते. डॉ. दिलीप यार्दी या शिबिराला आले होते. त्यावेळी अम्बाजोगाई पासून जवळ असलेल्या मुरंबी येथे हिवाळ्यात अनेक प्रकारची बदके व छोटे छोटे पाणपक्षी दिसतात याची माहिती मिळाली. आम्ही पक्षी मित्र झालो तेच मुळी मुरंबी तलावातील स्थलांतरित तलवार या बदकांच्या दर्शनाने. एकाच वेळी ५० ते ६० बदकांचा एकत्रित थवा पाहताना हरखून जायला व्हायचे. आमचा मित्र स्व. धर्मराज पाटील याने तर पक्ष्यांच्या जगातील विविधता आणि वैशिष्ट्ये इतकी बारकाव्याने दाखवली की आम्ही नेहमीच पक्षी निरीक्षण करू लागलो. मुलांना पक्ष्यांची माहिती देण्यासाठी घेतलेल्या या उपक्रमामुळे एका वेगळ्या जगात रमण्याची संधीच आम्हाला मिळाली. आपला भोवताल पुस्तकी दृष्टीने न पाहता निसर्ग वाचण्याची सवय लागली. आजूबाजूला दिसणाऱ्या पक्ष्यांच्या जीवनाबद्दल कुतुहल निर्माण झाले.

सातत्याने १०-१२ वर्षे मुरंबी तलावावर जात असताना दुष्काळ देखील अनुभवायला मिळाला. साधारण २०१३ पासून मराठवाड्यातील पावसाचे प्रमाण कमी होऊ लागले. २०१४ व २०१५ या साली फेब्रुवारी व मार्च मध्ये गारपीट झाली. २०१५ व २०१६ या वर्षी सर्वात कमी पाऊस पडला.मुरंबी तलावातील पाण्याची पातळी कमी कमी होत होती.कोरडे पडत चाललेल्या या तळ्यात पावसाळ्यात गाळ पेरणी व्हायला सुरुवात झाली. पाणी कमी होत असले तरी २०११ नंतर पहिली तीन ते चार वर्ष मुरंबी व आसपासच्या परिसरातील पाणवठ्यांवर स्थलांतरित पक्ष्यांची संख्या चांगली होती. स्थलांतरित पक्ष्यांची विविधता पूर्वी इतकीच असली तरी संख्या मात्र दिवसेंदिवस रोडावत होती. दुष्काळ पडल्याने पाण्याचे व्यवस्थापन यावर शासकीय पातळीवर हालचाली सुरू झाल्या. अनेक तळी गाळाने भरली असल्याने पाण्याचा साठा पूर्वीसारखा होत नव्हता. पाण्याचा साठा पूर्ववत व्हावा यासाठी  तलावातील गाळ काढण्याचे काम मराठवाड्यात सगळीकडेच जोमाने सुरू झाले. तळ्यातील गाळ काढला की शेती साठी पाण्याची सोय होऊ शकणार होती. काही ठिकाणी ही तळी हेच पिण्याच्या पाण्याचेही स्रोत होते.त्यामुळे गाळ उपसणे गरजेचे होते. जर गाळ उपसला गेला नसता तर मानवाचे व पर्यायाने प्राणी-पक्षी यांचेही जीवन विस्कळीत झाले असते. गाळ काढण्याचे काम चालू होते तेव्हाच रस्ता रुंदी करण व नूतनीकरणाची कामे देखील सुरू झाली. गाळ उपसल्यानंतर आम्ही आशा बाळगून होतो की आता पुनश्च पक्ष्यांचे आगमन होईल.

योगायोगाने पाऊसही छान झाला. तळ्यातील पाणी वाढले. गाळ शेती आता बंद झाली. तळ्याच्या कडेने आता फारशी दलदल दिसत नव्हती. ऑक्टोबर व नोव्हेंबर महिना सरला.पक्षी येतील म्हणत जानेवारी संपत आला. स्थलांतरित पक्षी आले परंतु त्यांची संख्या पूर्वी इतकी नव्हती. पूर्वी तळ्यावर केलेल्या एका भेटीत देखील पक्ष्यांची विविधता दिसून येई. मात्र आता दोन तीनदा तळ्यावर गेल्यानंतर पूर्वी इतक्या विविधतेची नोंद होत नव्हती यावर्षी कमी आले तरी पुढच्या वर्षी येतील असे म्हणत तीन वर्षे गेली. पण पक्ष्यांच्या संख्येत व विविधतेत म्हणावी तशी वाढ झाली नाही. पाणी वाढले पण पक्षी संख्या वाढत नव्हती.

पक्षी कमी होण्याची कारणमीमांसा करताना आम्हाला काही मुद्दे लक्षात आले. यामध्ये पाणवठ्यांची देखभाल करत असताना पर्यावरण कसे सांभाळता येईल यावर विचार करणे अपरिहार्य वाटू लागले. तळ्यातील गाळ काढताना व गाळ पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी काही नियमावली शासनाने केली तर पर्यावरण संवर्धन जास्त चांगल्या रीतीने होऊ शकेल.  तळ्यातील गाळ उपसताना तळ्यातील जैव विविधतेला हानी न पोहोचविता गाळ उपसण्याची प्रक्रिया होणे गरजेचे आहे.

तळ्यातील गाळ काढताना खालील प्रमाणे सूचना देणे आवश्यक आहे.

१. तळ्यातील गाळ काढताना तळ्याच्या कडे कडेने असलेला गाळ न काढता तळ्याच्या मध्य भागातला गाळ काढावा. कडेने असलेल्या उथळ भागात दलदल तयार होते व त्यामुळे या ठिकाणी स्थलान्तरीत व स्थानिक पक्ष्यांचे वास्तव्य जास्त पाहायला मिळते.

२. गाळ काढण्यासाठी वाहन तळ्याच्या मध्य भागात जावे लागते. वाहनांना मध्ये जाण्यासाठी व बाहेर येण्या साठीचा रस्ता दर वेळी वेगळा वेगळा वापरला जाऊ नये. तळ्याच्या मध्य भागात जाण्यासाठी अनेक रस्ते झाले तर तळ्याच्या कडेने असलेल्या जैव विविधतेला धक्का पोहोचेल.

३. तळ्याच्या मध्ये काही झाडे असतील तर ती काढू नयेत अगर त्यांना धक्का लागणार नाही याची काळजी घ्यावी. ही झाडे पक्ष्यांच्या वसाहतींची झाडे असतात. ही झाडे टिकून राहिली तर पक्ष्यांचे वास्तव्य टिकून राहते.

४. तळ्यातील गाळ काढताना तळ्यात काही ठिकाणी गाळाचे उंचवटे आहे तसे राहू देणे आवश्यक असते. अशा उंचवट्यातील जैव विविधता टिकून राहिल्याने पुन्हा जेव्हा तळी पाण्याने भरतात तेव्हा या उंचवट्यातील उपलब्ध बीजांचा त्या तळ्यातील जैविक घटक पुनश्च वाढीस लागण्यास हातभार लागतो. एकदा अशा रीतीने तळ्यातील वनस्पती वाढल्या की इतर जैवविविधता वाढण्यासही मदत होते. ही जैवविविधता वाढली व तळ्यातील किनाऱ्याची दलदल जपली गेली तर आपोआप पक्षी, प्राणी यांचे वास्तव्य टिकून राहते.

५. गाळ शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना काही नियम घालून देणे आवश्यक आहे. गाळ पेरणी केल्यानंतर या जमिनीत रासायनिक खताचा वापर करण्यास मनाई असावी. या खतांच्या वापराने त्या जमिनीतील कीटक व मासे यांचे अस्तित्व संपण्याची शक्यता वाढते.

६. गाळ पेरणी झालेल्या शेतीत कीटकनाशकांचा वापर करणे घातक आहे. ही कीटकनाशके तळ्यातील पाण्यात जातात. हे पाणी जनावरे, कीटक, पक्षी यांचे पेय असल्याने त्यांच्या जीवास हानिकारक ठरते. अशा कीटक नाशकाच्या वापरावर बंदी आणणे अनिवार्य आहे. निव्वळ बंदी जाहीर करून भागणार नाही तर गाळ पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांवर लक्ष ठेवणे व प्रबोधन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कीटकनाशक वापरल्याने या मातीतील कीटक, अळ्या अथवा मासे नष्ट होतील. हे सजीव नसतील तर बदके, चमचा, टीलवा, तुतवार, क्रौंच, बगळे इत्यादी अनेक पक्षी या परिसरात येणार नाहीत.

७. तळ्यांमधील गाळ काढल्यानंतर तळ्यात देवधान किंवा डकविड गवत वाढवले तर तेथे येणाऱ्या बदकांना व पाणपक्ष्यांना योग्य खाद्य मिळते. त्यामुळे अशा प्रकारच्या गवताचे तळ्यातील पाण्यात मुद्दाम संवर्धन करणे गरजेचे आहे.

शासनाने या गोष्टींवर लक्ष देणे गरजेचे आहे. यापुढेही अशा रीतीने गाळ उपसणे अथवा गाळ पेरणी होईल त्या त्या वेळी त्यासाठी योग्य ते नियम व निर्बंध घालण्याची गरज आहे. आपण पक्षी मित्रांनी देखील याबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे.

येत्या काही वर्षात पुन्हा एकदा पक्षी वैभव पूर्वी सारखेच आपल्या आसपासच्या तळ्यात नांदतील याची आशा बाळगू या व याबाबत आपापल्या परीने कार्य करू या.

*****



# ।। रानव्हले ।।



**प्रदीप ईक्कर**
पक्षीनिरीक्षक, मंठा जि.जालना
pradipikkar@gmail.com

रानव्हले हे तीन प्रकारात आढळून येतात. एक मोरव्हले , दुसरे साधे व्हले , आणि तिसरे कबूतरा सारखे दिसणारे. मोरव्हली मंजे,इटकरी रंगाच्या पंखावर गोलगोल ठिपके असलेलं सुंदर नक्षीकाम. आणि साधे व्हले हे एकदम साधे भुरकट मळकट रंगाचे. आणि तिसरे कबूतरा सारखे दिसणारे व्हले फिकट ढवळसर रंगाचे,मानेखाली काळ्या रंगाचा गोफ असल्यावनी गोल पट्टा. हे व्हले उंच मेडशींगीच्या झाडावर किंवा काटेहिवराच्या झाडावर घरटं करतात. तर मोरव्हले आणि साधे व्हले हे, काटेखैराच्या झाडावर,काटाळ बाभळीच्या झाडावर,लोखंडीच्या झाडावर किंवा बोरीच्या झाडावर घरटं करतात. व्हल्याची भाषा आपल्याला कळत जरी नसली तरी,ती ऐकायला खूप गोड आणि मधुर वाटते. पहाटेच्या पारी अन् सांच्यावेळी माळरानावर त्यायचा आवाज घुमत राहतो. ते एकमेकांशी संवाद साधतात त्यावेळी त्या संवादाचा गावखेड्यतल्या माणसांनी खुप मजेदार अर्थ लावलाय. जसं की ,
सासूजी काय झालं पोट दुखतय कुठशी ..
बेंबीच्या देठाशी
किंवा,
घू....घू... गुरख्या तू वाचेल मी मरशील तू...

व्हले एकमेकांशी असं बोलतात तेव्हा खूप मजेशीर आणि लयीत असतं ते! गुरख्या संबदी हे विधान किंवा गुरख्याला दिलेला हा शाप (श्राप) कशामुळे किंवा कारण काय तर, गुराखी हा ढोरं घेऊन कायम माळरानावर, गुरख्याला व्हलीची घरटी, अंडी, पिल्लं माहीत असतात. गुराखी हा अंड्यांना किंवा पिलांना त्रास देत असावा, किंवा काही तरी खोडी करत असावा म्हणून हा शाप. इतर पाखरांच्या तुलनेत, घरटं बांधण्याच्या बाबतीत व्हले खुपचं आळशी असतात किंवा इतर पाखरासारखं सुंदर घरटं त्यांना बांधताच येत नसावं बहुतेक! एकदा वापरलेलं घरटं, पुन्हा पाखरं ते घरटं वापरत नाहीत म्हणूणच कि काय व्हले नादर घरटं बांधण्याच्या फंद्यात पडत नसावेत, जास्त कष्ट घेत नसावेत.इतर पाखरांची घरटी सुंदर नसली ,तरी बऱ्यापैकी असतात.

व्हल्याच घरटं मातर खुप साधं, सोपं, ओबड धोबडच. वाळक्या चार काटक्या आडव्या तिडव्या टाकून ते तात्पुरतं घरटं तयार करतेत. खुरटच्या बाभळीच्या झाडावर,बोराटीच्या झुडपात,हेंकळणी टांखळणीच्या बुटक्या झाडावर किंवा आपट्याच्या झाडावर व्हल्याची घरटी हमखास पाहायला मिळतात.

असंच एका साध्या व्हलीने खडकदरीच्या वावरातल्या बांधावरच्या खुरट्या आपट्याच्या झुडपावर घरटं तयार केलं.नेहमी प्रमाणे आबडधोबडच.हे आपट्याच झुडुप अगदीच खुजं, खुरटं.एखद्या मोकाट कुत्र्यांने त्या खोडावर झ्याप टाकली तर त्या घरट्यातले व्हलगीचे अंडी सहजपणे कुत्र्याच्या तोंडात येतील. किंवा एखाद्या रानबोक्याच्या नजरेत पडून, रानबोक्या कधी फस्त करील सांगता येत नाही. येवढं खुजं ते आपट्याच झुडुप होतं.खडकदरीच्या वावरातले, आखरावरवरल्या पडीक रानातले अन् गावखरच्या रानातले सगळेच झाडं असी खुजी, खुरटी करून टाकलेली. शेळ्या चारणाऱ्याने भुंडी भुंडी करून टाकलेली. नवा शेंडा,नवी पालवी फुटली की कुऱ्हाडीने तोडताड करून टाकलेली. कुणी बकऱ्यासाठी कवळ्या डांग्या तोडून नेतय. तर कुणी शेळ्या जागवण्यासाठी तिथल्या झाडांच्या फांद्या कुर्हाडीने साळतय. बरं काही बोलायची सोय नाही. बोलायला गेलं की, बीणकामाची तर झाडं हेत, चार फांद्या तोडल्या म्हणून काय झालं? असं उलट उत्तर देतात. त्यांना शेळ्या जगवायची फिकीर. तर आपला झाडांसाठी जीव तुटतो.

व्हले अगदी मख्ख आणि शांत स्वभावाचे असतात.इतर पाखरासारखे कधी आक्रमक होत नाहीत . एखाद्या परड जातीचा सरोप किंवा मुंगूस घरट्यात शिरून त्यांची अंडी खात असेल तर हे व्हले प्रतिहल्ला करीत नाहीत.

व्हले कधी थव्याने, समुहाने राहत नाहीत. ते जोडीनं ,एकटे दुकटे राहतात.फार तर दोघं नर मादी आणि त्यांची दोन पिल्लं असे मिळून राहतात. उन्हाळा पावसाळा,अन् हिवाळ्यात या तीनही ऋतूत व्हली मादी अंडी घालते. विशेष कार्तिक (आक्टोंबर) महिन्यात जास्त करून अंडी घालतात.

या दिवसात आदिवासी पोरं गलुल घेऊन शिकार करीत रानावनात, माळरानावर हिंडतात. दुपारची वेळ शिकारीसाठी सोईची ,उत्तम वेळ.कारण दुपार हि पाखरांची विश्रांती घेण्याची वेळ असते.दुपारवेळी झाडझडोऱ्यात पाखरं पेंगत असतात.त्यात व्हल्याची जोडी डोळे मिटून आरामशीर ध्यानस्थ बसलेले असतात.अशावेळी ही आदिवासी पोरं नेम धरून गलुलीतला दगड सोडतात.नेमबाज पोरांचा नेम खाली जात नाही.वर्मी घाव बसून जोडीतला एक जीव फडफडत टपकण खाली पडतो.रक्तबंबाळ होऊन गतप्राण होतो.तेव्हा दुसरा जोडीदार सावध होऊन भरारी घेऊन उडून जातो . शिकार होऊन बळी पडलेली मादी असेल तर, तीच्या घरट्यातल्या पिल्लांच काय व्हईल याची कल्पनाही करवत नाही.

कारण मादीच आपल्या पिलांचे संगोपन करत असते, चारा भरवत असते. नर व्हला मातर पिल्लांची काळजी करीत नाही.तो पिल्लांना सोडून दुसरी मादी हेरून तीच्या सोबत निघून जातो.

गतप्राण झालेला जीव काखेतल्या झोळीत टाकून पोरं दुसरं सावज हेरतात. पाच दहा व्हले मारून झोळी भरतात.दिवसभर रानात भटकून पोरं भुकेजतात, तेव्हा चार वाळक्या काटक्या गोळा करून एखादी व्हली तिथेच जाळावर होरपळतात ,भाजून खातात.

कधी व्हलीचे घरटे शोधून त्यातली अंडी घेऊन जातात. तर असं हे खडकदरीच्या वावरातल्या आपट्याच्या झुडपावर व्हलीच घरटं.पंधरा दिवसांपूर्वी तिने घरट्यात पांढरीशुभ्र दोन अंडी घातलेली. आता आता कालपरवा तिने अंडी घोळवून घोळवून उबवलेली. त्यातून दोन कोवळी गोजिरी पिल्लं बाहेर आली होती.अगदी नाजूक, कापसाच्या पुंजक्या सारखी मऊमऊ. अजून त्यायची डोळे सुदीक उघडलेली नव्हती. अन अशातच अवकाळी पावसाच संकट पिल्लांवर येऊन ठेपलं होतं. डिराकळ्या फोडीत ढग दाटून आले.डुरडुर करीत सोसाट्याच वारं सुटलं. घरट्यात दोन कोवळे जीव. घरटं चोहोबाजूंनी उघडं, आणि मोकळंच. कसलाच आडुसा नाही. वारं भणभणत गिरक्या घेत आलं. खुरटं झुडुप डगमगलं . घरट्यात पिल्लं भेदरून गेली.

कसलीच हालचाल न करता ती निपचित पडून होती. खरं तर अशा वादळी पाऊस वाऱ्याची पाखरांना सवय झालेली असते.अशी संकटं त्यांना नवीन नसतात. चारा शोधायला गेलेली व्हलगी धांदल घाईने आली . दोन्ही पिल्लांना पंखाखाली घेऊन पंख पखरून बसली. माईचा केवढा आधार मिळाला पिल्लांना. हस्ताचे टपोरे थेंब रपरपत आले. टपोर थेंबाचा मारा व्हलगी अंगावर झेलत होती. पाऊसथेंब तीच्या अंगाला झोंबत होते. डोळे मिटून पाऊसमारा सोसत ती देहाचा मुटकुळं करून बसून राहीली. आपल्या पिलांना पाऊसथेंब लागु नये याची खबरदारी घेत राहिली. आदळून आपटून काही वेळाने पाऊस उघडला.ती इतका वेळ बसून राहिल्या मुळे अवघडून गेली. पाय गळून आले. ती उठली, फांदीवर बसली. वले पंख झटकले.लगेच अंग हाडकले. पाखराच एक बरं असतं.आपल्यासारखं त्यांना कपडे बदलण्याची गरज नसते, पंख झटकले की अंग कोरडं फटांग होतंय. हस्ताच नक्षत्र सरलं. चटकणारं ऊन कमी झालं. पाऊसही परतीच्या प्रवासाला निघून गेला. आभाळ नीळं फटांग झालं. कार्तिकातली कवळी थंडी जाणवू लागली. अन् व्हलीचे पिल्लं वरचेवर टणक व्हवू लागली. हळुहळू पंखात बळ येऊ लागलं.







*****

# माळरानावरील चंडोल' ते 'थाई थाई'



**माणिक पुरी**
परभणी
manikpuri01021984@gmail.com

निसर्गात जिथं स्वतःला थांबावसं वाटतं अशा अनेक जागा असतात. तिथं मन रमायला उसंत मिळते. त्या जागी पुन्हा - पुन्हा जावसं वाटतं. आजूबाजूला असणारी झाडं, पक्षी, प्राणी, फुलपाखरं आणि अजून बरंच काही पाहायला मिळतं. निसर्गातील अशा अनेक गोष्टी फक्त पाहण्यातून कळत नाहीत तर त्यासाठी निरीक्षणाची जोड द्यावी लागते. पक्ष्यांच्या, फुलपाखरांच्या निरीक्षणातून अनेक अफलातून गोष्टी कळत जातात. लेखक किरण मोरे यांनी सुद्धा पक्षीनिरीक्षणातून पक्षीजगत समजून घेतलय. खरं तर त्यांचा प्रवास पक्षीमित्र ते पक्षीअभ्यासक असा आहे.

मला अजूनही आठवतं की, मी सोलापूरला पक्षीनिरीक्षण करत असताना समोर अचानक किरण मोरे यांची भेट झाली. तेव्हा ते वारकरी पक्ष्यांचे निरिक्षण करण्यात गुंग होते. त्यांनी पाणपक्ष्यांचे काही फोटो सुद्धा घेतले. त्यापूर्वी आम्ही फोनवर बोलतच असू. पण या तळ्याच्या काठालगत मनसोक्त चर्चा करता आली नाही. खरं तर ते चर्चेचं ठिकाणही नव्हतं.

काही वर्षांपूर्वी त्यांनी 'चंडोल' या पक्ष्यांच्या जीवनाचा धांडोळा घेणारा माहितीपट तयार केला. त्यानिमित्ताने माळरानावरील पाखरांचा त्यांना अभ्यास करता आला. त्यांचा नव्याने पक्षीअभ्यासक ते लेखक असा प्रवास सुरू झाला. माळरानावरील नोंदी नियमितपणे करू लागले. त्यातून काही लेखही लिहिले. वर्तमानपत्रातून प्रसिद्धही झाले. हळू-हळू त्यांचे पहिले पुस्तक आकाराला येऊ लागले.

'माळरानावरील चंडोल' हे त्यांचे पहिले पुस्तक. चंडोल पक्ष्यांच्या प्रजातींची तोंडओळख तर होतेच. सोबतच त्या पक्ष्यांचे स्थलांतर, विणीचा काळ, घरटे, आवाज व गायन यांची सुद्धा माहिती कळू लागते. त्यांच्या निरीक्षणातील नोंदी वाचायला मिळाल्या. लालपंखी चंडोल आणि गवई चंडोल यांच्यातील सूक्ष्म फरकही त्यांनी दाखवून दिला आहे म्हणून ते पक्षीमित्र ते पक्षीअभ्यासक आहेत असे मी म्हणालो.

ज्येष्ठ पक्षीतज्ज्ञ डॉ. अनिल पिंपळापुरे लिहितात की, माळरान या उपकारी पण उपेक्षित परिसंस्थेचे कुलचिन्ह म्हणजे चंडोल. श्री किरण मोरे यांनी विदर्भातील माळरानावर आढळणाऱ्या चंडोल पक्षीगटाची ओळख सोप्या व सहज शास्त्रीय भाषेत 'माळरानावरील चंडोल' या पुस्तकात करून दिली आहे.

माळरानावरील चंडोल पक्ष्यांच्या अधिवासात प्रचंड ढवळाढवळ सुरू आहे ही बाब लेखकाने अधोरेखित केली आहे. या पक्ष्यांच्या हक्काचा अधिवास मानवाने गिळून घेतल्यावर ही प्रजाती नष्ट व्हायला वेळ लागणार नाही. तेव्हा माळरान जपलं पाहिजे ही लेखकाची आग्रही भूमिका या पुस्तकातून वाचायला मिळते.

'शबल' हे त्यांचे दुसरे पुस्तक. या पुस्तकात पक्षी लेखमाला वाचायला मिळते. या पुस्तकातील नोंदीसाठी लेखकाला भरपूर भटकंती करावी लागली. पक्ष्यांच्या विणीच्या काळातील काही दुर्मिळ नोंदी शबल मधून कळू लागतात. नव्याने पक्षीनिरीक्षण करू पाहणाऱ्यांसाठी हे पुस्तक उपयुक्त आहे.

'रंगीत पाणलावा' या पक्ष्याची एकल पालकत्वाची भूमिका लेखकाने मनोरंजक पद्धतीने रेखाटली आहे. सहसा मादीसाठी लढणारे नर पाहिलेत पण इथे मात्र अगदी उलटच पाहायला मिळतं. रंगीत पाणलावा पक्ष्यात बहुपतित्वाची पद्धत पाहायला मिळते. पक्षीजगताची पानं उलगडून पाहताना अशा अनेक गोष्टी पुढ्यात अवतरतात हेच खरं!

'स्टेप मॉम' या लेखातून कोकीळ, पावश्या या पक्ष्यांच्या जीवनाचा धावता आढावा लेखकाने मांडला आहे. त्यासोबतच कावळा, राखी सातभाई, जांभळ्या पुठ्याचा शिंजीर, जंगली सातभाई, लांब शेपटीचा खाटीक या पक्ष्यांची भूमिका सुद्धा तेवढीच महत्त्वाची आहे हे या लेखातून कळू लागते. स्टेप मॉम जर नसतील तर कोकीळ, पावश्या या पक्ष्यांच्या प्रजाती नष्ट व्हायला वेळ लागणारच नाही. पक्षीशास्त्र समजून घेण्यासाठी अशा नोंदी उपयुक्त ठरतात.

लेखक किरण मोरे यांनी या नोंदीसाठी रानोमाळ भटकंती केल्याचे दिसून येते. त्यांच्या निरीक्षणातील सातत्य आणि चिकाटी याचा प्रत्यय लेख वाचताना येतोच.

राखी खाटीक, चिमण चंडोल या पक्ष्यांच्या विणीच्या काळातील नोंदी लेखकाने टिपल्या आहेत. 'पाणपक्ष्यांची तळी' या लेखातून पाणपक्ष्यांच्या अधिवासातील धोके अधोरेखित करून त्या अधिवासाची होत चाललेली हानी लेखकाच्या नजरेतून सुटली नाही. पक्ष्यांच्या अधिवासाचे संवर्धन झालं पाहिजे ही लेखकाची माफक अपेक्षा!

'थाई थाई' हे त्यांचे तिसरे पुस्तक. पहिल्या दोन पुस्तकापेक्षा यातील विषय वेगळा जरी असला तरी मध्यवर्ती कल्पना ही पक्ष्यांचीच आहे. थायलंड येथे हॉर्नबिल (धनेश) पक्ष्यांसंदर्भात जागतिक परिषद आयोजित करण्यात आली होती. त्या परिषदेस एक अभ्यासक म्हणून लेखक उपस्थित राहिले होते. पक्षी संशोधनासोबतच थायलंड मधील पर्यटनाविषयीच्या नोंदी या पुस्तकातून वाचायला मिळाल्या. थाई थाई म्हणजे प्रवासवर्णनच!

दक्षिण आफ्रिकेतील तरुण संशोधक 'काईल' याने ग्राउंड हॉर्नबिल या प्रजातीविषयी केलेलं संशोधन मला खूप महत्त्वाचं वाटतं. मी पहिल्यांदाच या जमिनीवर राहणाऱ्या धनेश पक्ष्यांविषयी वाचत होतो. त्याचं मला कुतूहल सुद्धा होतं. काईल संशोधक या पक्ष्याला 'थंडरबर्ड' म्हणून ओळखतो.

महाराष्ट्रात शरद आपटे यांनी पक्ष्यांच्या आवाजाविषयी लिहून ठेवलय. त्याप्रमाणे काईल यांना सुद्धा धनेशच्या आवाजाविषयी भरभरून बोलताना पाहिलय असं पक्षी अभ्यासक किरण मोरे यांनी त्यांच्या पुस्तकातून मांडलय. पूजा पवार ही तरुणी सुद्धा महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या पर्वतरांगेत धनेश पक्ष्यांवर संशोधन करत आहे. तिने केलेली निरीक्षणे काईल यांच्या निरीक्षणाशी साम्य पावतात हे विशेष!

दुर्मिळ होत चाललेल्या धनेश प्रजातीविषयी जागतिक स्तरावर परिषद आयोजित करून त्या पक्ष्यांच्या संवर्धनासाठी काय उपयोजना करता येतील याविषयी झालेली चर्चा मला खूप महत्त्वाची वाटते. लेखकाने प्रामाणिकपणे त्या सर्व बाबी आपल्या पुस्तकातून मांडल्या आहेत. त्यातून लेखकाची पक्ष्यांविषयीची तळमळ कळू लागते.

थाई थाई या पुस्तकात एकूण १९ लेख आहेत. खरं तर ही एक लेखमालाच आहे. लेखकाला आलेले अनुभव त्यांनी शब्दबद्ध केले आहेत. थायलंड मधील प्रसिद्ध लेखिका 'प्रिन्सेस विभावदी रंगसित' यांच्या विषयीच्या 'व्हाया विभावदी' हा लेख मनापासून आवडला. विभावदीचे वडील थायलंडमधील प्रसिद्ध कवी होते. वडिलांकडून तिला लेखनाचा वारसा मिळाला होता म्हणून ती वयाच्या १८ व्या वर्षी 'प्रिसना' ही कादंबरी लिहू शकली.

लेखक किरण मोरे यांनी विभावदी या लेखिकेविषयीची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. विभावदी यांच्या घरापासून सुरू झालेला प्रवास त्यांच्या साहित्य विश्वात घेऊन जातो. तो प्रवास लेख वाचल्यानंतरही सतत मनात डोकावत राहतो. लेखकाने पक्ष्यांचा धांडोळा घेतलाय आणि या लेखिकेच्या साहित्यासंदर्भात चिकित्सक विचारही केला आहे.

थायलंड मधील अनेक दृश्य लेखकाला अस्वस्थ करतात. जगाचा थायलंडकडे पाहण्याचा दृष्टिकोन फारच वेगळा आहे. कदाचित लेखकाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही तसाच असू शकतो. पण लेखकाने अनुभवलेले थायलंड यापेक्षा फार वेगळे आहे. लेखकाला तेथील समुद्र वारंवार खुणावतो. तेव्हा लेखक मध्यरात्री सुद्धा समुद्राच्या लाटांचा आवाज ऐकत तासन् तास बसतात. तेथील झाडांचा त्यांना लळा लागलेला. तेथील सुंदर निसर्ग त्यांच्या अंगभर भिनत चाललेला. तेव्हा लेखक निसर्गाशी एकरूप होताना दिसतो. 'कोरल' बेटावर त्याचा प्रत्ययही येतो.

थायलंडची खाद्यसंस्कृती किती वेगळ्या प्रकारची आहे हे लेखकाने 'नाईट मार्केट','चायना टाऊन' या लेखांच्या माध्यमातून सांगितले आहे. 'सिनेमन' लेखातून लेखकाची जिज्ञासू वृत्ती दृष्टीस पडते.

लेखकाने टिपलेला भवताल आणि त्यातून लेखकाची होणारी घुसमट अनेक ठिकाणच्या अनुभवातून कळू लागते. तेव्हा व्यक्त होण्याची गरजही भासत नाही असं मला वाटतं. अशावेळी लेखक एक त्रयस्त व्यक्ती म्हणून या सगळ्या भोवतालाकडे पाहतो. तो फक्त निरीक्षण करत राहतो.

प्राणीसंग्रहालयातील वाघ आणि पर्यटकांना त्यातून मिळणारा अघोरी आनंद यामुळे लेखक बेचैन होताना दिसतो. बंदिस्त वाघ जणू माणसांना आनंद मिळवून देण्याचे साधनच! माणसाला हवे तेव्हा वाघाने बसायचे, उठायचे, फोटोसाठी तयार व्हायचे, डरकाळी फोडायची हे सगळं काय चाललंय? असा प्रश्न लेखकाच्या मनात घोळत राहतो. असे अनेक प्रसंग पाहिले की वन्यप्राण्यांविषयीच्या कायदा आठवतो. पण कायदा आठवून फारसा उपयोग होत नाही.

देश कोणताही असो तेथील पक्षी, प्राणी यांना अभय मिळावं ही लेखकाची अपेक्षा अनेक लेखातून वाचायला मिळते. ती अपेक्षा रास्त आहे असं मला सुद्धा वाटतं.

सध्या निसर्गाची प्रचंड लूट होताना दिसते. माणसांचं निर्ढावलेपण पुन्हा- पुन्हा दिसू लागतं. ही बाब केवळ थायलंडची नाही. प्रातिनिधिक स्वरूपात लेखकाने जरी एका देशासंदर्भात केलेलं विधान असलं तरी ती गोष्ट सगळ्यांनाच लागू पडणारी आहे. निसर्गातील ढवळा-ढवळ, मनमानी सुरूच आहे. माणसाचं लक्ष फक्त स्वतःला काय वाटतं याच्याकडेच आहे. त्याच्या अंतर्मनाला सुद्धा चंगळवादानं घेरून टाकलयं. निसर्गाच्या लूटीमागचं अर्थकारण आंधळेपणाचं सोंग घेऊन दळण दळताना दिसतय. याचे भयावह परिणाम भोगावे लागतील हे मात्र नक्कीच!

एकीकडे गगनचुंबी इमारत तर दुसरीकडे खाणकामात तयार झालेले प्रचंड खड्डे. दोन्ही ठिकाणी माणसांचं होणारं शोषण. त्यातून वाम मार्गाचा अवलंब करणारी तरुणाई. सगळं कसं डोळ्यादेखत उध्वस्त होताना दिसतय. डोळ्यांना दिपवणाऱ्या झगमगटाच्या पडद्यामागे खूप काही दडलेलं आहे हे कळून सुद्धा माणसांचं अंतर्मन झोपेचं सोंग घेताना दिसतय. माणसांना पाहिजे तो फक्त पैसा. त्यासाठी काहीही करण्याची तयारी दिसते.

पटायाच्या रोडवरील मुलींच्या डोळ्यातील भाव पाहून लेखक अस्वस्थ होतोच. पण तेथील कुटुंब व्यवस्थेची होत चाललेली वाताहत डोळ्याआड करता येणार नाही हे सुद्धा तितकच खरं आहे. 'समीर गायकवाड' यांनी 'खुलूस' च्या माध्यमातून देहविक्री करणाऱ्या महिलांचं दुःख उलगडून दाखविलं आहे. त्यांच्या वाट्याला आलेल्या वेदना या खुलूस पुस्तकातून चित्रित केल्या आहेत. लेखक किरण मोरे यांनी सुद्धा या देहविक्री करणाऱ्या मुलींच्या आयुष्यातील प्रसंग जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

मोठ्या शहरात पोट भरण्यासाठी करावी लागणारी तारेवरची कसरत आणि उद्भवणाऱ्या समस्यांचा टोकदारपणा लेखकाला सतत टोचत असतो. लेखक सोडून इतरांना जर तो टोकदारपणा टोचत असेल तर तो वाचक.

माळरानावरील चंडोल, शबल आणि थाई थाई या तीनही पुस्तकांचे सुंदर मुखपृष्ठ चित्रकार 'निनाद अभंग' यांनी रेखाटले आहे. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! लेखक किरण मोरे यांच्या पुढील लेखनास शुभेच्छा.




*****

# श्री. दिगंबर गाडगीळ व्यक्ती आणि प्रवास (उत्तरार्ध)

महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेतर्फे देण्यात येणाऱ्या पक्षिमित्र पुरस्कारांची घोषणा झाली. २०२३ यावर्षीचा पक्षिमित्र जीवनगौरव पुरस्कार श्री. दिगंबर गाडगीळ यांना जाहीर झाल्याचे वाचून आनंद झाला. या आनंदाला दोन प्रमुख करणे. पहिलं कारण म्हणजे सर्वसामान्य माणूस एक उत्तम पक्षीमित्र कसा असतो याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे श्री. दिगंबर गाडगीळ आणि दुसरे म्हणजे पक्षीजीवनातून वेचलेले स्वजीवनाचे अनुभव शब्दबद्ध केलेले लेखन. याची प्रचिती त्यांना भेटल्यावर झाली. त्यांच्या सोबतच्या सांभाषणातून अधिक स्पष्टपणे जाणवले. त्यांच्या प्रकाशीत कृतींचा परामर्श घेतल्यावर वाटले की त्यांचे विचार आणि एकंदर त्यांचा प्रवास सर्वापर्यंत पोहोचवावा. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर जानेवारी २०२४ मध्ये पुणे येथे राघवेंद्र वंजारी यांनी गाडगीळ सरांची घेतलेल्या मुलाखतीचा पूर्वार्ध आपण मागील अंकात वाचला.या भागात उत्तरार्ध पाहूया.

**लेखक ते संपादक हा प्रवास कसा झाला ?**

कॉलेज मध्ये असल्यापासून लेखनाची सवय जडली गेली. मग हळू हळू नवनवीन विषयातून लेखन करत राहिलो. त्यानंतर लेख लिहीत आवाका वाढला ते ओळखून पुस्तक लिहिण्याचा प्रयत्न केला. लेखाच्या संचयातून पुस्तक निर्मिती झाली. अशाच अनुभवातून पहिले पुस्तक आले. ते म्हणजे पक्षिगाथा. नंतर देशोदेशीचे राजपक्षी आणि निसर्गाची नवलाई. यासह तरुण भारत लेखाचा संचय प्रकाशीत केला. हास्य चळवळीमधील हसता हसता आरोग्य हे पुस्तक प्रकाशित झाल. सेवेतून निवृत्तझाल्यानंतर महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेच्या त्रैमासिकेस संपादक म्हणून अनेक सेवा करत आलो आहे. दरम्यान संपादकीय लेखनातून विचार मांडले. विविध संस्था अनेक लोक, छायाचित्रकार मंडळी यांच्या सोबत काम करता आल. एकूणच निसर्ग संवर्धनास आवश्यक असणारे मुद्दे जनसामान्यापर्यंत पोहोचले.

**महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेची पहिली सभा किंवा संमेलनात तुम्ही होता. त्याचे फोटो देखील उपलब्ध आहे त्याविषयी सांगा.**

सुरुवातीच्या काळात पुण्याचे पक्षि अभ्यासक प्रकाश गोळे हे फार परिचित पक्षि अभ्यासक असल्यामुळे संघटनेची पहिली संमेलन ही निसर्गाच्या सानिध्यात अर्थात लोणावळाच्या हिरवळीमध्ये घेतली. या मध्ये मुख्यतः प्रकाश गोळे, त्यांच्या पत्नी स्वाती गोळे, याचबरोबर प्रमुख पाहुणे न्यायमूर्ती पटवर्धन हे होते. याच बरोबर वन-आधिकारी मारुती चित्तमपल्ली मार्गदर्शक म्हणून लाभले.

**भारतातील नामवंत पक्षी तज्ञाचा सहवास तुम्हाला लाभला, त्या आठवणी आम्हालाही सांगा.**

खूप वर्षांचा कालावधी यामध्ये होतो. या क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्ती बरोबर मला पक्षी निरीक्षण करता आल. त्यामध्ये सलीम अली,माधवराव गोगटे, सतीश पांडे, दिलीप यार्दी आणि एरिक भरूचा असे अनेक तज्ञ पक्षी अभ्यासक होते.

शब्दांकन
**राघवेंद्र वंजारी** - सोलापूर



**मी दिगंबर गाडगीळ सरांसमवेत. जानेवारी २०२४, पुणे.**

*****



श्री. माणिक पुरी यांच्या पक्षी येती अंगणी या कादंबरीस स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार मिळाल्याबद्दल सारस वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, जिंतूर यांच्याकडून सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला

# माळरानाची सफर



**श्री. विजय ढाकणे**
पक्षीनिरीक्षक, जिंतूर
vijaydhakane1191@gmail.com

गावकुसाजवळच्या माळरानाच्या परिसरात पोहचलो. रखरखत्या उन्हातही माळरानावरचं जीवन बहरलेलं होतं. विविध रंगाची गवतफुले फुलपाखरांसोबतच आम्हालाही साद घालत होती. या रानफुलांमुळे रणरणत्या उन्हातही माळरानांवर भटकंती करण्याची ओढ असायची. माळरानावरचं वाळलेलं गवत मोहुन टाकत होतं. चिमण चंडोल, टिटवी सारखे माळरानावरचे पाखरं आपल्या पुढच्या पिढया जन्माला घालण्यासाठी सुरक्षित जागा शोधत माळरानावर भटकताना नजरेस पडत होते. सुट्टीचा दिवस असला की, माळरानावरचं हे जीवन नव्याने पुन्हा-पुन्हा अनुभवण्यासाठी आमची पावलं आपोआपच माळरानाकडे वळायची.

वाळलेल्या गवताशिवाय आणि खुरटया झाडा - झुडूपाशिवाय माळरानावर फारसं काही दिसत नव्हतं. कडूलिंबाची काही लहान मोठी हिरवी झाडं लक्ष वेधून घेत होती. रखरखत्या उन्हात तेवढीच काय ती हिरवळ डोळ्याला सुखावणारी होती. दुपारच्या उन्हात निलगायींना कडूलिंबाच्या झाडांचाच काय तो आधार असायचा. मिळेल तेवढ्या सावलीत दाटीने निलगायी विश्रांती घेताना दिसायच्या. निलगायी किंवा हरणं आपली विष्ठा एकाच जागेवर टाकतात. माळरानावर अनेक ठिकाणी निलगायींच्या लेंडयांचे ढिग पडलेले दिसायचे. त्याला मखर म्हणतात. माळरानांवरील असे मखर त्यांच्या तेथील वास्तव्याची जाणीव करून देत राहतात.

काही अंतर चालून गेल्यावर एका उंच पळसाच्या झाडाच्या शेंडयावर शिकारी पक्ष्याची हालचाल जाणवल्याने आम्ही पुन्हा जागेवरच थबकलो. दुर्बीण लावुन अंदाज घेतला तर आखुड बोटाच्या सर्प गरूडाची एक जोडी पळसाच्या झाडावर शिकारीच्या शोधात टेहळणी करत होती. बोनेलीचा गरूड आणि तिसा (व्हाईट आय बझार्ड) या भागात मी यापुर्वी कित्येकवेळा पाहिला होता, पण आखुड बोटाचा सर्पगरूड आज पहिल्यांदाच दिसला होता. हया माळरानावरची आजची ही अतिशय महत्वाची नोंद होती. आम्ही जवळ जावून त्याचे निरीक्षण करत होतो. आमची चाहूल लागताच एक सर्पगरूड भरारी घेत पश्चिमेकडे दुरवर असलेल्या कडुलिंबाच्या झाडावर जावुन बसला. दुसरा मात्र आमच्या हालचालीकडे दुर्लक्ष करत त्याच्याच धुंदीत निवांत बसला होता. जणू आमच्या उपस्थितीचा त्याला फारसा काही फरक पडणार नव्हता. एक - एक करत आम्ही दुर्बीणीने त्या सर्पगरूडाचे निरीक्षण करू लागलो. सवयीप्रमाणे माणिक पुरी नोंदी घेण्यात व्यस्त होते. तर माझा कॅमेरा सोबत नसल्याने आज मला निरीक्षणाशिवाय दुसरा काहीच पर्याय नव्हता. तलावाकडे जाण्याचा रस्ता बराच वेळ सर्प गरूडाने अडवून धरल्या सारखे वाटले. काही वेळ सर्पगरुडाचे निरिक्षण करून मी उत्तरेकडे असलेल्या पाझर तलावाकडे निघालो. पाझर तलाव कोरडा पडलेला होता. माळरानावरचे पाणी ओघळून नैसर्गीकरीत्या तयार झालेल्या वळमनीत बऱ्यापैकी ओल राहत असल्याने काही भागात बेशरम चांगलीच फोफावलेली होती. अशी बेशरम तरस, कोल्हे, खोकड, ससे यांच्या राहण्यासाठी फार उपयोगी असते. हयाच बेशरमीत मागच्या वर्षी तरसाची नोंद आम्ही घेतली होती. नुसती नोंदच घेऊन थांबलो नाहीत तर हया परिसरातील त्याचा अधिवास शोधण्यासाठी आम्ही दोन तीन मैल त्याचा पाठलाग केला होता.

पिवळया डोक्याच्या सुतारपक्ष्यांच्या दोन जोडया एका पळसाच्या झाडावर येवून बसल्या. बसल्या म्हणजे अगदी काही क्षणंच ... पुन्हा इकडुन तिकडे, तिकडुन इकडे त्यांची पळापळ सुरूच होती. त्यांचा हा खेळ पाहुन मला लहानपणी गल्लीतल्या मित्रांसोबत खेळलेला शिवणापाणी आणि लपंडावचा खेळ आठवला. मध्येच हे सुतारपक्षी भुर्रकन दूर उडून जात तर काही क्षणातच पुन्हा- पुन्हा पळसाच्या खोडावर येवून बसत आणि पुन्हा त्यांचा लपंडाव सुरू होई. या फांदीवरून त्या फांदीवर असा त्यांचा खेळ बराच वेळ सुरू होता. मध्येच खोडावर आपल्या धारदार चोंचीने टक- टक आवाज करून खोदल्यासारखे करते खोडावरून झरझर खाली वर करत होते.

घरटयासाठी जागा शोधत असावेत की झाडाच्या खोडावरील बारीक बारीक किडे वेचून खात असावेत हे कळायला मात्र मार्ग नव्हता.

सुतारपक्ष्यांचं निरीक्षण करत असताना मध्येच कडुलिंबाच्या एका झाडावरून शिरकीर मालकोहा अर्थातच मुंगशा या पक्ष्याने भरारी घेतली आणि आमच्या काही लक्षात यायच्या आत तो बाजुच्या झुडुपातून दिसेनासा झाला. जालना शहराजवळच्या वनक्षेत्रात मुंगशाचा पाठलाग केल्याची आठवण झाली. मुंगशा हा भारद्वाज पक्ष्याच्या कुळातील पक्षी त्यामुळं तो फार उंच न उडता जमिनीला अगदी समांतर असा बारीक उडया घेत उडत असतो. कालपासुन माळरानावर जैवविविधतेचं अनोखं दर्शन होत असल्याने आमचा आनंद काही औरच होता. हया माळरानाचा परिसर जैवविविधतेने किती समृद्ध आहे याची प्रचिती आज येत होती.

किर्तापूर आणि धानोरा शिवारामधून वाहणाऱ्या ओढयामध्येच शेतकऱ्यांनी विहीरी खोदल्याने इथला अधिवास काहीसा भंग पावला होता. खोदलेल्या विहीरीचे मुरमाड अवशेष इतरत्र पसरले होते. जिकडे पाहावं तिकडे फक्त मुरुमाच्या दगडांचे ढीगच ढीग दिसत होते. मोठ मोठया दगडांची भली मोठी रांग एका बाजुने दुरवर पसरलेली होती. मुंगशाचा पाठलाग करत मी काहीसा पुढे सरकलो. माळावरच्या दगडांच्या कपारीमधुन भलं मोठं शृंगी घुबड उडुन दुरवर पुन्हा दगडांच्या कपारीत जावून बसलं. मी त्याच्यावर लक्ष ठेवून होतोच. बाकीच्यांना खुणावुन मी त्या घुबडाच्या मागावर पुढं सरकत होतो. ओढयाच्या पात्रात नव्यानेच खोदलेल्या विहीरीच्या खरपणावर काळतोंडया वानरांची एक टोळी निवांत बसली होती. वानरांची काही पिलं आईच्या अंगावर उडया मारण्यात मग्न होती तर काही मोठी झालेली पिलं एकमेकांसोबत खेळण्यात दंग होती. काही पिलं उगाच या ढिगलावरून त्या ढिगलावर उडया मारून एकमेकांचा पाठलाग करत होती. टोळीचा म्होरक्या दुरवर एका झाडाच्या शेंडयावर पाय ताणुन आपल्या साम्राज्याची टेहळणी करत होता.

त्या दरीत असलेल्या विविध झाडांचं, छोटया आटलेल्या पाणवठयांचं निरीक्षण करत, नोंदी घेत आम्ही पुढे- पुढे सरकत होतो. पायाजवळुन एक रातवा उडुन काही अंतरावर जावून बसला. येलदरी परिसरात रातव्यांचं एक जंगलंच आहे. तिथं अनेकदा भटकंती केली आहे. रातवा हया पक्ष्यांचं दगडांशी व मातीशी बरंच साधर्म्य असल्याने जवळ जाईपर्यंत तो दिसत नाही. आणि जवळून उडाला तरी त्याच्या पंखांचा आवाज होत नसल्याने जवळून उडून गेला तरी तो लक्षात येत नाही. रातव्यावर मात्र आता पुर्ण नजर ठेवून आम्ही हळूहळू त्याला शोधत त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करत होतो. दुस-या वेळेसही त्याला आमची चाहुल लागली आणि त्याने आमच्या पासून दुरावा ठेवण्यासाठी भरारी घेतली आणि तो बाजूच्याच एका लहानशा दगडावर जावून बसला. दगडाच्या रंगाशी एकरूप झाल्याने नविन व्यक्तीला तो दिसणे तसे कठीणच. पण पक्ष्यांना शोधण्यात आम्हाला आता बऱ्यापैकी नजर आल्याने आम्ही लगेच पक्ष्यांचा शोध घेवून त्याचे निरीक्षण करत असत. रातवा दिसला होता. एकमेकांना शांतपणे खाली बसण्याच्या खाणाखुणा करत आम्ही हालचाल न करता काहीवेळ खाली जमिनीवर बसुन राहीलो. दुर्बिणीतून पाहिले असता रातव्याने डोळे बंद करून समाधी लावली होती . पाठीवरची बॅग तिथेच टाकुन मी जमिनीवर सरपटत रातव्याकडे निघालो. बाकीची मंडळी आहे तिथेच थांबली होती. शंभर ते दोनशे फुट अंतरावरून सरपटत मी रातव्याच्या जवळ पोचलो होतो. पुन्हा काहीवेळ निपचित पडुन मी बाकीच्यांना जवळ येण्यासाठी खुणावले. खाली बसत बसत माणिक पुरी आणि अनया जवळ आले होते. अनिल उरटवाड अजून आहे तिथेच बसलेला होता. काही वेळ शांत बसल्यावर मी पुन्हा सरपटण्यास सुरूवात करून त्याच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करत होतो. रातव्याचे डोळे अजूनही बंदच होते. काही अंतर सरपटत नाही तोच अनया मध्येच उठुन उभी राहीली आणि रातव्याला चाहूल लागली. रातवा सावध झाला. सरपटताना माझी हालचाल रातव्याच्या लक्षात आली आणि क्षणात त्याने तिथुन भरारी घेतली ते पुन्हा दुस-या दगडावर. ह्यावेळी अनयाचा खरं तर खूप राग आला होता. पण तिला काहीच न बोलता मी पुन्हा रातव्याच्या मागावर गेलो. वरच्या बाजुला टेकडयावर एका लहानशा खडकावर महाशय मस्त विराजमान होवून डोळे मिटुन ध्यानाला बसल्यासारखे भासत होते . पण पुन्हा काही क्षणच, पुन्हा मी जवळ जाताच त्याने दगडावरून भरारी घेतली ती दुरपर्यंत... आता ये मला शोधायला असं तर कदाचित मला हिणवत नसावा..

*****

## पुस्तक समिक्षण

### निवडक भारतीय पक्षीः अप्रतिम पुस्तक

मागील २५ वर्षापेक्षा जास्त काळ पक्ष्यांच्या दुनियेत रमणाऱ्या डॉ अरविंद कुलकर्णी व श्री. सुरेश जोंधळे यांनी त्यांच्या अनुभवातून लिहिलेले, निवडक भारतीय पक्षी हे पुस्तक नुकतेच वेदांतश्री प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केले आहे. खरे तर डॉ. अरविंद कुळकर्णी हे मत्स्यशाळेचे प्राध्यापक, परंतु कधी त्यांना या पक्ष्यांनी मोहीत केले हे कळालेच नाही. त्यांनी त्यांच्या संशोधक सहकाऱ्यासोबत केलेले पक्षी निरीक्षण विविध शोधपत्रिकेत प्रकाशित केले आहेत. यासाठी त्यांना विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या मार्फत दोन लघुशोध प्रकल्प मंजूर झाले होते. या मध्ये किनवट जंगलातील पक्षी व नांदेड शहर व परिसरातील पक्षी यावर त्यांनी शोध प्रकल्प पूर्ण केले. डॉ. कुलकर्णी यांनी मराठवाड्यात बहुतेक ठिकाणी पक्षी निरीक्षण करून त्यांची नोंद केलेली आहे. यात प्रामुख्याने किनवट व माहूरचे जंगल, नांदेड व आसपासचा परिसर, कंधारचा जगतूंग सागर, नांदेडचे भरतपूर म्हणून प्रसिद्ध असलेले शिखाची वाडी, पैनगंगा नदी, औरंगाबाद (तेव्हाचे) येथील सलीम अली सरोवर, हिमायतबाग, पैठण येथील नाथसागर अंबेजोगाई येथील धरणे व जलाशये, हिंगोली येथील डोंगरकडा जलाशय, नांदेड येथील विद्यापीठ परिसर, गोदावरीचा नदीचा परिसर ई ठिकाणी त्यांच्या सहका-यांनी नोंद घेतलेली दिसून येते. यासोबत ज्या ठिकाणी त्यांच वास्तव्य दहा किंवा त्यापेक्षा जास्त दिवस झाले होते, त्या ठिकाणी सुध्दा त्यांनी पक्षी निरीक्षण करून नोंद घेतली आहे. यात प्रामुख्याने शिमला, मुंबई, सिमाडोह (मेळघाट) ही ठिकाणे नमूद करावी वाटतात. अशा या व्यक्तिने सेवानिवृत्ती नंतर सुद्धा पक्ष्यांवर प्रेम करायचे सोडले नाही. जेव्हा त्यांनी पक्ष्यांवर संशोधन केले तेव्हा त्यांना असे दिसून आले की, नवीन पक्षी निरीक्षकास विशेषतः आपल्या मराठी भाषेत असे पुस्तक नकीच फायदेशीर ठरेल. म्हणून त्यांनी हे पुस्तक सोप्या व सुटसुटीत भाषेत लिहिले आहे.

हे पुस्तक लिहित असताना त्यांनी अरण्याऋषी श्री. मारुती चितमपल्ली यांचे पक्षिकोश, पक्षी जगत - सचिन मेन, शेती मित्र पक्षी - डॉ. महेश गायकवाड या व ई. अनेक पुस्तकांचा संदर्भ म्हणून उपयोग केलेला आहे. एखादी व्यक्ति सेवानिवृत्त झाल्यानंतर अगदी आरामात आपले जीवन व्यतीत करीत असते परंतू डॉ. कुलकर्णी यांच्या बाबतीत हे उलटे झालेले आहे. सेवा संपल्यानंतर त्यांची पक्ष्यांबद्दल असलेली ओढ आणखीन वाढलेली दिसून येते. अजूनही दररोज सकाळी फिरत असताना पक्षी निरीक्षण तर करतातच तसेच ते आपल्या गावाकडे - म्हणजे उस्माननगर लाठी या भागात आठवड्याला एकदा जात असतात. तेथे जातांना डॉ. सालिम अली यांचे द बूक ऑफ इंडियन बर्ड हे पुस्तक आणि निरीक्षण करण्याची दुर्बिण त्यांच्या सोबत असते म्हणूनच त्यांनी आजपर्यंत नोंद केलेले हे पक्षी वैभव जनसामान्यापर्यंत विशेष करून नवीन तरुण पिढी पर्यंत पोहचविण्यासाठी निवडक भारतीय पक्षी हे पुस्तक मराठी भाषेत लिहिले आहे. या पुस्तकात पक्ष्यांचे वर्गीकरण, अधिवास, शरीर रचना, त्यांचे खाद्य, प्रजनन काळ, त्यांचा उपयोग इ. माहिती अतिशय सोप्या भाषेत देण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. जवळपास १३८ पक्ष्यांच्या प्रजाती रंगीत छायाचित्रांसह या पुस्तकात देण्यात आल्या आहेत. लेखकांनी आपल्या मनोगता मध्ये पक्ष्यांचे असलेले महत्व अधोरेखीत करताना अगदी प्राचीन काळापासून पक्ष्यांचा होत आलेला अभ्यास, विविध पौराणिक ग्रंथात पक्ष्यांचे असलेले संदर्भ, ब्रिटीश काळात केले गेलेले पक्ष्यांवर संशोधन तसेच डॉ. सलीम अली यांनी केलेले पथदर्शक कार्य यावर भाष्य केले आहे. तसेच मराठवाड्या मध्ये असलेली ठिकाणे ज्या ठिकाणी नवीन पक्षी अभ्यासकांना खरोखरच पक्षी निरीक्षणांची मजा लुटता येईल अशी काही ठिकाणे यात सांगितली आहेत. हे सर्व या पुस्तकात लेखकांनी मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.




**डॉ. जयवर्धन बलखंडे**
नांदेड

## छायाचित्राची गोष्ट

# आखुड बोटांच्या सापमार गरुडाची जेट विमानाप्रमाणे शिकारीसाठी लँडिंग



**धनंजय गुट्टे**
लातूर
dhananjay.gutte@gmail.com

मराठवाड्यातील बीड आणि लातूर जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात माळरान, डोंगर भाग आपल्याला दिसून येतो. इथली जैवविविधता जंगलांच्या तुलनेत फार वेगळी आहे. खुरटी झुडूपे, आणि मोजकीच वृक्ष संपदा व त्यासोबत नापीक असलेला गवताळ प्रदेश. याठिकाणी सरपटणारे प्राणी आणि शिकारी पक्षी हे बऱ्याचदा या भागात फिरताना आढळून येतात. माझ्या गुट्टेवाडी ता. परळी जि. बिड गावाजवळच असलेल्या उजनी येथील वन्यजीवांची आवड असलेला मित्र गणेश टाक यांनी त्यांच्या गावालगत असलेल्या आईच्या माळावर प्राणी, पक्षी पाहण्यासाठी बोलावल्याने मी पहाटेच तिथे गेलो. सोबत कॅमेरा घेऊन गेलो. माळरानाच्या पायथ्याशी वर चढताना खोकड दिसला आणि एका लिंबाच्या झाडावर हुमा / शृंगी घुबड बसलेले. आम्हाला पाहून अगदी हळूवार पंखांचा आवाज न करता उडून लांब जाऊन बसले. आम्ही आईच्या माळाच्या टेकडीवर जाऊन पोहचलो तेवढ्यात दोन चिंकारा आम्हाला पाहून धूम ठोकत टूनटुन उड्या मारत पळाले. सोबतचा कॅमेरा काढून फोटो घेईपर्यंत तर ते दिसेनासे झाले. त्यानंतर मात्र आम्ही कॅमेरा, दुर्बीण तयारीत ठेवूनच दबक्या पावलांनी थोडेसे माळावरील पठारी भागावर आल्यानंतर अचानकच दगडांच्या जवळून एक रानससा म्हणजेच भारतीय ससा उठून जोरात पाळायला लागला. तो क्षण आम्ही कॅमेऱ्यात टिपला. आम्ही माळावर उंच ठिकाणी पोहचल्यावर आकाशात दोन आखुड बोटांचे सापमार गरुड पक्षी घिरट्या घालताना दिसले. माझे मित्र गणेश टाक यांनी मागच्याच आठवड्यात याच माळावर सापमार गरुड पक्ष्याने एक भला मोठा घोणस सापाची शिकार करताना पाहिले व त्यानंतर त्याने तो साप उचलून घेऊन जाताना अगदी जवळून पाहिले. पण त्याचे फोटो व्यवस्थित काढता आले नसल्याचे त्याने बोलून दाखवले. त्यामुळे आमची उत्सुकता अजूनच शिगेला पोहचली अन् पुन्हा एकदा असा प्रसंग पाहायला मिळेल आणि कॅमेऱ्यात टिपता येईल असे वाटले. आकाशात काही वेळ घिरट्या घेत ते गरुड पक्षी अचानक खाली यायचे व पुन्हा भरारी घेऊन दुसऱ्या बाजूला जायचे. आम्ही मात्र यावेळी व्यवस्थित फोटो काढता यायला हवेत म्हणून कॅमेऱ्यांची सेटिंग लावून घेतली अन् ते गरुड जातील त्या दिशेने आम्ही पायपीट करायला लागलो. अगदी माळावरच्या या टेकडीवरून त्या टेकडीवर अशी आमची कॅमेरा घेऊन बेजारी झाली. कॅमेरा सांभाळत दगडगोट्यावरून पळताना आमची मात्र घामाने अंघोळ होत होती. त्या गरुड पक्ष्यांनी उंचावरून खाली येत शिकार करतील आणि तो थरारक क्षण कॅमेऱ्यात टिपता येईल हे आमचे स्वप्न धुळीस मिळाले होते. कारण आखुड बोटांचा सापमार गरुड पक्षी उंचच उंच आकाशात घिरट्या घेत दूरवर दुसऱ्या माळावर निघून गेले. त्यानंतर आम्ही काहीसे हताश होऊन माळावरुन खाली उतरून पाणी प्यायलो व पुन्हा कधीतरी तो क्षण टिपता येईल या अपेक्षेने कॅमेरा बॅगेत ठेवून दुसऱ्या पाणवठ्याकडे पक्षी निरीक्षण करण्यासाठी मोटार सायकल वरून निघालोत.

पक्षी पाहण्यासाठी पुन्हा एकदा नव्या उमेदीने दुसरीकडे रस्त्याने जाताना आजूबाजूला पडीत गवताळ जमीन दिसत होती. गाडी पुढे चालत होती व चालवताना मात्र आमची नजर काही तरी पाहायला मिळेल या हेतूने आजूबाजूला सैरभैर फिरत होती.

आईचा माळ ओलांडून आम्ही पुढे जात होतो एवढ्यात मागच्या बाजूने अचानकच जेट विमानाप्रमाणे लँडिंग करत रस्त्याच्या बाजूला असलेल्या पडकात सापमार गरुड उतरून एका ठिकाणी थांबला. आम्ही हा प्रसंग पाहून थक्क झालो. अन् गाडी रस्त्याच्या बाजूला हळूवार थांबवली. पुढे काही अंतरावर गरुड जमिनीवर वाळलेल्या गवतात पायाने काहीतरी कसरत करत असल्याचे दिसले. गाडीवरून उतरून कॅमेरा काढला. मित्र गणेश टाक आणि मी गरुडाच्या दिशेने हळूवार स्वतःला लपवत जमिनीवरून गुडघ्यावर आणि कोपरावर क्राऊलिंग करत पुढे सरकत होतो आणि समोर एक पळसाचे छोटेसे झाड होते त्याच्या आड थांबून त्या सापमार गरुडाचे छायाचित्रे टिपली.

त्या गरुड पक्ष्याने उंचावरून एक शिकार पाहिली होती. त्यासाठी तो जमिनीवर अगदी विमानाच्या लँडिंगप्रमाणे खाली

आला व पडीत जमिनीवर सुकलेल्या गवतात एका छोट्याशा दगडाच्या बाजूला एक घोरपडीचे छोटेसे पिल्लू (Bengal Monitor Lizard) होते ते त्याने त्याच्या पंज्यामध्ये घट्ट पकडले आणि टॉस केल्याप्रमाणे हवेत टाकून तोंडात गटकन गिळून घेतले. सुरुवातीला त्या घोरपडीला तोंडाकडून एकाच घासात गिळले. घोरपडीची शेपटी चोचीच्या बाहेर दिसत होती तेव्हा मात्र त्याने दुसऱ्या घासात शेपटीसह घोरपडीचे पिल्लू गिळले आणि परत तो गरुड आकाशाकडे झेपावला. त्याचा शिकारीचा हा अगदी काही सेकंदाचा क्षण पाहायला व कॅमेऱ्यात टिपायला मिळाला याचे आम्हाला समाधान मिळाले. मनात खूप आनंद झाला होता की, आईच्या माळावर असा क्षण पाहता येईल ही उत्सुकता आमची होती परंतु ती खाली रोडने जाताना अनुभवता आली याचा आनंद मावत नव्हता. तर आम्ही परत फिरताना आमचे गुडघे आणि कोपर यांची झालेली अवस्था पाहून गरुडाने केलेल्या शिकारीच्या त्या चित्तथरारक क्षणापुढे नगण्य होती. निसर्ग चक्रातील अन्नसाखळीचा उत्तम नमुना असलेला हा अविस्मरणीय क्षण मला खुप काही शिकवून गेला. निसर्ग, जंगल भ्रमंती असो, पक्षिनिरीक्षण अथवा वन्यजीव छायाचित्रण असो आपल्याला ज्या भागात जायचे आहे, जे पक्षी वन्यजीव पाहायचे आहेत त्याचा अधिवास व जीवनशैली याचा अभ्यास असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासोबतच पक्ष्यांचे होणारे स्थलांतर , त्यांचे अन्न, अधिवास, त्यांचा प्रजनन काळ, ठिकाणे इत्यादी बाबी विचारात घेऊन व त्याचा जुजबी अभ्यास आवश्यक असल्यास पक्षिनिरीक्षण अधिक आनंददायी व मजेशीर होते हे नक्की. वन्यजीवांची फोटोग्राफी करताना वन्यजीवांना धोका होणार नाही याची सर्वात जास्त खबरदारी आपण घ्यायला हवी हे विसरून चालणार नाही.

*****

## ई - बर्ड मंथली चॅलेंजच्या विजेत्या

कॉर्नेल लॅब व ऑर्नीथोलॉजी द्वारे विकसित केलेले ई-बर्ड हे पक्ष्यांच्या नोंदी घेण्याचे जागतिक संकेतस्थळ आहे. जिथे आपण नोंदवलेल्या पक्ष्यांच्या पक्षीसूची पूर्ण जगामध्ये दिसतात व पूर्ण जगाच्या पक्षी नोंदी आपल्याला पाहता येतात. हे एक प्रकारचे सिटीझन सायन्स. ज्यामुळे पक्ष्यांची सद्यस्थिती, वाढलेली अथवा कमी झालेली संख्या, स्थलांतर मार्ग इत्यादीची माहिती मिळते यावरून कुठल्या पक्ष्यांना संवर्धन गरजेचे याचेही निष्कर्ष निघतात अशा ई बर्ड संकेतस्थळावर दर महिन्याला मंथली चॅलेंज प्रतियोगीता ठेवली जाते ज्याचा मुख्य उद्देश पक्षांची नविन स्थळे शोधण्यासाठी आणि तेथील पक्षी प्रजाती ओळखण्यासाठी आहे. जेणेकरून सिटीजन सायन्सला हातभार लागेल. यात एका ठिकाणच्या कमीतकमी २० पक्षीसूची नोंदविणे आवश्यक असते यावेळी ऑगस्ट चॅलेंजमध्ये १३३ पक्षीनिरीक्षकांनी यशस्वीरीत्या पूर्ण केले. आणि त्यात महाराष्ट्र पक्षीमित्रच्या सदस्या श्रीमती चित्रा इंगोले यांनी बाजी मारली बक्षीस स्वरुपात ई-बई कडून त्यांना पर्यावरणावरील अॅट द फिट ऑफ लिव्हिंग थिंग हे पुस्तक देण्यात आले. चित्रा इंगोले या उत्तम पक्षीनिरीक्षक व पत्रकार आहेत भारतातील विविध भागात पक्षी निरीक्षण करून पक्ष्यांचा अभ्यासपूर्ण नोंदी घेण्यात त्यांचे सातत्य आहे. महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेतर्फे चित्रा इंगोले यांचे हार्दिक अभिनंदन आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा



**चित्रा इंगोले**
चंद्रपूर






# स्वागत नवीन सभासदांचे

## (दिनांक ०१ एप्रिल २०२४ ते ३० जून २०२४ )

| क्र. | गाव | नाव | फोन नं. | ई. मेल |
|---|---|---|---|---|
| १५९७ | आमला | श्री. सुमित मोहन अंबुलकर | 8007806167 | sumitambulkar@gmail.com |
| १५९८ | नागपूर | श्री. पराग नंदकुमार देशमुख | 9371182568 | paragorama@gmail.com |
| १५९९ | ठाणे | सौ. वंदना विश्वास अडसुले | 9757163898 | vanee03ad@gmail.com |
| १६०० | अकोला | सौ. प्रियंका सर्वेश अग्रवाल | 8888516469 | pusarvesh@gmail.com |
| १६०१ | अकोला | श्री सर्वेश पुरूषोत्तम अग्रवाल | 888857476 | sarveshagrawal29@gmail.com |
| १६०२ | मुंबई | श्री. किशोर नरेंद्र जोशी | 9820278046 | joshikishor1963@gmail.com |
| १६०३ | मुंबई | श्री. भारत लालचंद वखारिखा | 9833932300 | info@productpromotions.in |
| १६०४ | नागपूर | श्री. राजेंद्र राऊतिया | 9422828560 | rajurautia@gmail.com |
| १६०५ | अकोला | श्री गिरीष विलासराव आखरे | 9766881100 | girishakhare@gmail.com |
| १६०६ | नाशिक | श्री. प्रमोद सुभाष सोनवने | | promoshiva111@gmail.com |
| १६०७ | पुणे | श्री. दिपक शिंदे | 9850704294 | deepakshinde1959@gmail.com |
| १६०८ | यवतमाळ | श्री. अमोल श्रीरंग मुनेश्वर | 9405329391 | amol18011984@gmail.com |
| १६०९ | अकोला | श्री. अभिजीत तुलशीराम चिंम | 8788133630 | abhijeetchim649@gmail.com |
| १६१० | नागपूर | कु. एकता विलास पांगे | 9664792454 | ektapange@gmail.com |
| १६११ | पुणे | श्री. संतोष शंकर दळवी | 9922382385 | padhmanabha@gmail.com |
| १६१२ | अकोला | श्री. पवन नानाजी गावंडे | 9766695554 | pavan976665554@gmail.com |



## शामा

## White - rumped Shama *(Copsychus malabaricus)*



**रवींद्र वामनाचार्य**
नाशिक
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in

हा पक्षी दयाळ जातीच्या पक्ष्यांमध्ये गणला जातो. शामा पक्षी भारतभर सर्वत्र म्हणजे पश्चिम घाटातील जंगल, तामिळनाडूतील कावेरी खोऱ्यातील जंगल, पश्चिम भारतातील द्वीपकल्पीय जंगल, गुजरातमध्ये सुरत व डांग जिल्हयातील जंगल या ठिकाणी दिसतो. तसेच बांगलादेश, म्यानमार व श्रीलंका या देशातही यांची वसाहत आहे. जंगलातील झुडपी भाग, खडकाळ भाग, मोकळ्या ओसाडबागा अशा ठिकाणी एकाकी रहाणे हा पसंत करतो. शामा हा लाजाळू स्वभावाचा पक्षी असल्यामुळे दयाळ पक्ष्याप्रमाणे हा माणसाच्या जवळ येत नाही.

शामा हा गाणाऱ्या प्रक्ष्यामध्ये सर्वश्रेष्ठ गायक आहे. त्याचे गाणे सर्व पक्षात मधुर असते. तो गळा फुलवून शीळ घालतो. त्याचे गाणे बासरीसारखे लयबद्ध व कर्णमधुर असते. तानावर ताना घेत ताकदीने धुंदपणे गात असतो. फेब्रुवारी ते पावसाळ्यापर्यंत त्याचे गायन चालु असते.

शामा पक्षी २५ से.मी. आकाराचा असून त्याची शेपूट खूप लांब असते. शेपटासह तो दहा इंच लांब असतो. त्यात शेपूटच सहा इंच लांब असते. याचे डोके मान पाठ पंख, कंठ व छाती चमकदार काळी असते. शेपटीवरील पिसे काळी असतात तर खालील पिसे पांढरी असतात. शेपटीच्या बुडख्याखालील रंग पांढरा असतो. मादीचा रंग राखी असतो. खालचा रंग राखट तपकिरी असतो. तिची शेपटी आखूड असते. श्यामाचे डोळे व चोच दयाळसारखे काळेभोर असतात.

शामाला डोंगर टेकड्यांतले नद्यानात्यातील पानगळीचे जंगल आवडते. तो जमिनीवरील व झुडपांवरील पतंग व नाकतोडे खातो. तसेच सुरवंट व इतर किडे किटक खातो. शामाचा विणीचा हंगाम एप्रिल ते जूनमध्ये असतो. झाडाच्या नैसर्गिक ढोलीत तो गवताचे घरटे बांधतो. बांबूच्या वनातही त्याचे घरटे असते. जमिनीपासून घरटे सहा सात फुट उंचावर असते. त्यात मादी तीन ते चार अंडी घालते. अंडी उबविण्याचे काम फक्त मादी करते पिलांना खाऊ घालण्याचे काम नर-मादी मिळून करतात.

अशा या सुंदर पक्ष्यावर श्रीलंका देशाच्या टपाल विभागाने श्रीलंकेतील स्थानिक पक्षावरील तिकीट मालिकेमध्ये साडे चार रुपये किमतीचे टपाल तिकीट प्रकाशित केले आहे.





*****

## भाऊ काटदरे हे पर्यावरण भूषण पुरस्काराने सन्मानित



पर्यावरण क्षेत्रात गेली अनेक वर्षे कार्यरत आणि महाराष्ट्र पक्षीमित्रचे माजी अध्यक्ष **श्री भाऊ काटदरे** यांना एनव्हारमेंट क्लब ऑफ इंडीया तर्फे **पर्यावरण भूषण पुरस्काराने** सन्मानित करण्यात आले.

## श्री. द महाजन जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित



पर्यावरण क्षेत्रातील भीष्माचार्य **श्री द. महाजन** यांना एनव्हारमेंट क्लब ऑफ इंडीया तर्फे **जीवनगौरव पुरस्काराने** सन्मानित करण्यात आले.

*****

## सिसे उदेगाव तलाव येथे पक्षी कट्टा संपन्न



स्थानिक शिसे उदेगाव तलाव कुंभारी अकोला येथे महाराष्ट्र पक्षीमित्र व निसर्ग कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने पक्षीकट्टा आयोजित करण्यात आला. सदर पक्षीकट्ट्याअंतर्गत तलावावर आलेल्या पक्षांची ई-बर्ड व मर्लीन ॲपचा वापर करून पक्षांची नोंद करण्यात आली. पक्षी कट्ट्याचे समन्वयक डॉ.मिलिंद शिरभाते समन्वयक महाराष्ट्र पक्षीमित्र अकोला हे होते तसेच विदर्भ समन्वयक श्री अमोल सावंत, आजीवन सदस्य डॉ. संतोष सुरडकर डॉ.हरीश मालपाणी श्री विलास देशमुख, श्री प्रदीप किडीले श्री अभिजीत चीम, कु.मधुरा किडीले , चिकू उर्फ शौर्य सुरडकर तथा अन्य सदस्य देखील उपस्थित होते. यावेळी एकूण ४४ पक्षांची नोंद पक्षी कट्ट्यात करण्यात आली. सिसे उदेगाव तलावातील पक्षी व जैवविविधता यांचे संवर्धन करण्याची गरज पक्षी

*****

## ग्रासलँड बर्ड सर्व्हे २०२४

उत्तर महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना आयोजित ग्रासलँड बर्ड सर्व्हेचे आयोजन २२ व २३ सप्टेंबर २०२४ ला करण्यात आले होते. यशकल्याणी नेचर कॉन्झर्वेशन सोसायटीचे सदस्य, व कुंभेज येथील निसर्गप्रेमी विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्स्फुर्त सहभाग घेतला. वनविभागाच्या कुंभेज तालावालगतच्या माळरानावर दि. २२ सप्टेंबर रोजी पक्षी निरीक्षणादरम्यान ३७ प्रकारच्या प्रजातींचे १९१ पक्षी आढळून आले. उपक्रमासाठी समन्वयक प्रा.डॉ. कुऱ्हाडे सर यांनी मार्गदर्शन केले. हा उपक्रम राबवल्याबद्दल यशकल्याणी सेवाभावी संस्था पूणेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. गणेश करे पाटील यांनी सर्व बाल पक्षीनिरीक्षक विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या उपक्रमात सहभागाची संधी मिळाल्याबद्दल व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रा.डॉ. सुधाकर कुऱ्हाडे सर,मा. श्री. अनिल महाजन सर, मा. श्री. अभय उजागरे सर, मा. डॉ. अनिल माळी प्रा. करे पाटील सरांचे पक्षीनिरीक्षक मा. श्री.कल्याणराव साळुंके सर यांनी आभार व्यक्त केले.



Shree Gurudeo PRINTERS

- Offset Printing
- Multicolour Printing
- Printing Work of Stationery Materials
- Printing Work of All Types of Papers

BEST PRINTING SOLUTION

KEY NOTE

- A Superior Method To Print
- The Total Printing Arrangement
- Far Beyond Print
- Your One-quit Printing Arrangement
- At The Purpose When Quality Truly Matters
- Genuine Print Arrangements
- The Printing Experts
- Quality Printing For Fewer
- Pleasant Individuals With Decent Printing

OUR SERVICES

- School / College Magazine
- Booklet Printing
- Brochures
- Calenders
- Invitation Cards
- Leaflets
- Diary
- Hospital Stationery
- Corporate Stationery
- Folders

**Reg. Office**

Mahatma Fule Sankul, Infront of Abhiyanta Bhavan,
Shegaon Naka, V.M.V. Road, Amravati - 444603

Visit us : www.gurudeoprinters.com | Email : gurudeoprinters@gmail.com

**Ph : 0721-2666255, 09766656620, 09422420083**


A
LEADING
NATIONAL BOOKS
PUBLISHING
HOUSE IN INDIA

ISO 9001 : 2015
ज्ञानपथ® पब्लिकेशन

ISO 9001 : 2015
पायोनियर प्रकाशन

Publication Covers Following Discipline

- Engineering & Technology
- Science & Technology
- Religion & Theological
- Art & Literature
- Physical Education
- School /Children
- Science & Humanities
- Philosophy
- Social Science
- Medical
- Education
- Infotainment



DNYANPATH PUBLICATION

Write Well
Right now...

Features

- National Publication House
- ISBN Books For Academic Purposes
- E-book Edition Available
- Research Journals
- ISO 9001:2015 Certified
- Well Qualified Quality Control Team Of Experts
- Translated Books With Translation And Editing Facilities
- Quality Printing And Designing
- Sales Across The Country
- Online Sales Provider (Amazon, Flipkart, Bookganga)
- Distribution Facility

Skylark ART'S STUDY MATERIAL
B.A. | M.A. | B.Sc.

EAGLE Commerce Study Material
B.Com. | M.Com.

**Convert your PhD. Theses/ Dissertation Into a Book with Authentic ISBN**

**Reg. Office : Amravati**

FFS-A, Block C, First Floor, Venus Plaza,
Shegaon Naka, V.M.V. Road,
**Amravati**, Maharashtra 444 603

**Branch Office : Nagpur**

Flat No. 105, First floor, P.R. Plaza,
Main Road, Khamla,
Nagpur, Maharashtra 440 025

**Contact Details**

Visit us : www.dnyanpath.com
Email : dnyanpathpub@gmail.com
**8600353712, 9503237806**

# छायाचित्राची गोष्ट

## आखुड बोटांचा सापमार गरुडाची जेट विमानाप्रमाने शिकारीसाठी लँडिंग




जेट विमानाप्रमाने लँडिंग करत रस्त्याच्या बाजूला असलेल्या पडकात सापमार गरुड उतरून एका ठिकाणी थांबला. आम्ही हा प्रसंग पाहून थक्क झालो. मी गरुडाच्या दिशेने हळूवार स्वतःला लपवत जमिनीवरून गुडघ्यावर आणि कोपरावर क्राऊलिंग करत पुढे सरकत होतो आणि समोर एक पळसाचे छोटेसे झाड होते. त्याच्या आड थांबून त्या सापमार गरुडाचे छायाचित्रे टिपली......

(संपूर्ण गोष्ट पान क्र.१८ वर )



छायाचित्रकार
**श्री. धनंजय गुट्टे**
लातूर

Book Post

प्रती,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षीमित्र
६३, अरण्यार्पन समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*
*Mob.+91 7030101981*

**पक्षिमित्र**
संपादक : किरण मोरे
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : ज्ञानपथ प्रकाशन
मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन